|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : १९ सोमवार दि. ०१ मे २०२३ ते रविवार दि. ०७ मे २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड





# चारित्र्याच्या संशयामुळे कुटुंब उद्ध्वस्त झाले निर्दयी पतीने पत्नी आणि मुलीला ठार केले

जत (उमदी)/क्राईम रिपोर्टर



संसार म्हटला कि त्यात भांड्याला भांडे लागतेच. अशावेळी पती-पत्नी दोघांनीही समजदारीने वागायचे असते. एकमेकांना सांभाळून घ्यायचे असते, पण दुर्दैवाने तसे घडत नाही. वाद वाढत जातात आणि त्या वादाचे रुपांतर सुडाच्या भावनेत होते. अशावेळी ज्याच्यावर राग असतो तो जर तडाख्यात गावला नाही तर चिडलेला माणूस दुसऱ्यावरच राग काढतो. अशावेळी नातीगोती बघत नाही. खरे तर काही पुरुष भयंकर संशयखोर असतात. बायको सुंदर असली कि तिच्यावर संशय घेतात आणि त्या संशयातून सतत तिचा छळवाद करीत असतात आणि संशयाचे भूत खूप वाईट असते. एकदा का ते मानेवर बसले कि माणूस सैरभैर होतो, त्याला दुसरे काहीच सुचत नाही. तो फक्त एकाच गोष्टीचा विचार करीत असतो कि आपल्या बायकोचे दुसऱ्या कोणाशी तरी अनैतिक संबंध आहेत आणि आपली पाठ फिरली कि मग ती तिच्या यारासोबत मजा मारीत असते. बागलन तालुक्यातील लाडूत गावात राहणाऱ्या बाळासाहेब सखाराम ठाकरे याचेही तसेच झाले. चार मुले झाली तरी बाळासाहेबाचा त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. आणि त्याच संशयातून तो पत्नीला दारू पिऊन मारहाण करायचा. दरम्यान गावच्या जत्रेला घरातली सगळी माणसे गेली, पण मुलगी आणि पत्नी का गेली नाही. कदाचित घरात कोण नसताना तिला तिच्या याराला बोलावून घ्यायचा विचार असेल असा संशय बाळासाहेबाच्या मनात आला आणि याच संशयातून त्याने पत्नीची गळा दाबून हत्या केली. तर हि घटना मुलीने पाहिली म्हणून तिलाही गळा आवळून ठार मारले. आणि त्यांचे मृतदेह शेतातल्या झोपडीत टाकून पत्नी व मुलीची कुणीतरी हत्या केल्याची बोमाबोंब केली. मात्र पोलिसांनी त्याचा हा बनाव हाणून पाडला आणि पत्नी व मुलीच्या हत्येप्रकरणी त्याला अटक केली.



जत तालुक्यातील कर्नाटकला लागून असलेले गाव म्हणजे उमदी जवळील कुणीकोणुर होय. तेथून विजापुर जवळच असल्याने येथील लोकांचा रोटी बेटीचा व्यवहार हा कर्नाटकातील लोकांशी होत असतो. कुणीकोणुर येथील बिराप्पा बेंळंखु याचा विवाह गेल्या १३ वर्षापूर्वी खैराव येथील चौगुले याच्या कुटूंबातील प्रियांकाशी समाजाच्या रितीरिवाजानुसार झाला. बिराप्पा याची घरीच परिस्थीती ही सधन होती. तो टोणेवाडी-सनमडी रस्त्यालगत असणाऱ्या बेंळुखे वस्तीवर राहयला आहे. त्यांचा संसार बहरत फुलत असताना त्यांना दोन मुले आणि दोन मुली झाल्या. सध्या त्याची मोठी मुलगी मोहिनी ही सातवीत शिकते तर एक मुलगी आणि दोन मुले ही चवथीत आणि पाचवीत शिकत आहेत. बिराप्पा याची आर्थिक परिस्थीती ही सधन आहे. त्याचा पशुपालनाचा व्यवसाय असून त्याचे दररोजचे १८० लिटर दूध हे डेअरीला जात असते. त्याच्याजवळ १५ जर्शी गायी आहेत. त्यासाठी त्याने शेतात जनावरासाठी मोठा गोटा ही बांधलेला आहे. त्याच्याकडे ट्रॅक्टर असल्याने तो तो ही तो भाडयाने देत असतो. तसेच तो ऊस तोडणीसाठी मुकादम ही म्हणून काम करीत असल्याने साखर कारखान्याला तो ऊस मजुर पुरविण्याचे काम ही करतो त्याचा मोठा भाऊ हा पुण्यात मोठा व्यवसाय करीत असल्याने त्याचा ही हातभार घरच्या शेतीला लागत होता. टोणेवाडी-सनमडी रस्त्यावर बेळुंखे वस्तीवर तो पत्नी आपली आई आणि मुलासह राहयला आहे. एवढे सगळे असल्याने त्याच्याकडे पैशा हा सतत खुळखुळत होता. अलिकडे मात्र तो सतत कशाच्या तरी टेन्शनमध्ये असायचा. त्याला दारू पिण्याचे व्यसन ही लागले होते. ...पान २ वर

# दारूच्या नशेत संपत भयंकर चिडला भावाच्या घरात घुसून मुडदाच पाडला

सांगली (कुपवाड)/क्राईम रिपोर्टर



काही लोक असे असतात कि ते स्वतःही काही करीत नाहीत आणि दुसऱ्याने केलेलेही त्यांना बघवत नाही. अशा माणसाला कामधंदा नसल्याने दारूचे व्यसन लागते आणि मग दारूच्या नशेत तो कुटुंबातल्या लोकांना त्रास द्यायला सुरुवात करतो. कुपवाडा येथे राहणारा संपत शिंदे हा सुद्धा तसाच होता, तर त्याचा मोठा भाऊ डॉक्टर होता. मात्र मोठ्या भावाचे सुख त्याकला पाहवत नव्हते, त्याला वडिलोपार्जित जमिनीचा हिस्सा हवा होता, पण मोठा भाऊ त्याला हिस्सा देत नव्हता. त्यामुळे चिडलेल्या संपतने मोठ्या भावाची त्याच्या घरी जाऊन हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी संपात याला अटक केली आहे.



तासगाव जवळील वडगाव येथील डॉ.अनिल शिंदे हे गेल्या सात आठ वर्षापासून कुपवाड एमआयडीसीतील संत रोहिदास नगर येथील माऊली अपार्टमेंटमध्ये आपल्या पत्नी आणि दोन मुलासह भाडयाने राहयला आहेत. त्यांनी कुपवाड मधील हनुमाननगर बस स्टॉप शेजारी आपला दवाखाना सुरू करून लोकांना सेवा देत असतात. त्याची आई आणि लहान भाऊ संपत हे दोघेजण वडगाव येथील आपल्या मुळ घरात राहयला आहेत. संपतचे वय ३५ होत आले तरी त्याचे अदयाप लग्न जुळत नव्हते. तो मिळेल ते काम करून आपल्या आईची देखभाल करीत होता. घरची परिस्थीती ही बऱ्यापैकी होती.भाऊ शिकून डॉक्टर झाला, आपल्या पायावर उभा राहिला याचा त्याला अभिमान वाटत होता. त्याने ही डी.फॉर्मसी केले होते.पण तो काही नोकरी करीत नव्हता. सगळे काही व्यवस्थीत चालू असताना संपतला दारू पिण्याचे व्यसन लागले. त्यातून तो रोज आपल्या मित्रांच्याबरोबर दारू पिऊ लागला. तो घराकडे लक्ष देत नव्हता. भाऊ दारू पित असल्याने डॉ.अनिल शिंदे यांनी त्याला दारू पिऊ नकोस. चांगले वाग, तुझे लग्न ...पान २ वर

# माथेफिरू बापच बनला साप मुलाच्या हत्येचे केले त्याने पाप

संभाजी नगर/क्राईम रिपोर्टर



आजकाल माणसाला पटकन राग येतो आणि राग आला कि त्याचे स्वतःवर नियंत्रण राहत नाही. अशावेळी तो एकाचा राग दुसऱ्यावर काढतो. संभाजी नगर मधील चिखलठाणा भागात कौटुंबिक वादातून एका इसमाने आपल्या दोन मुलांना विहिरीत फेकले. त्यातील एकजण बचावला तर जो लहान होता त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी बापाला अटक केली आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये जन्मदात्या पित्यानेच पोटच्या दोन मुलांना विहिरीत फेकल्याची धक्कादायक घटना घडली आहे. किरकोळ कारणावरून या पित्याने विहिरीत फेकलेल्या एका मुलाला वाचवण्यात यश आले आहे, तर एचा बुडून मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पित्याला ताब्यात घेतले आहे. याविषयी सविस्तर माहिती अशी की, छत्रपती संभाजीनगर येथील चिकलठाणा भागात किरकोळ कौटुंबिक वादातून जन्मदात्याने बापाने आपल्या दोन मुलांना विहिरीत फेकले. यात एका मुलाला वाचवण्यात यश तर ...पान २ वर

# सुंदर संध्याने म्हाताऱ्याला पटवले तरुण यार मिळताच मार्गातून हटवले

डोंबिवली/एस.कुमार

प्रेम आंधळे असते. त्यामुळे कधी कधी प्रेमाला वयाची मर्यादाही दिसत नाही. कर्जत नजीकच्या किरवलीत राहणाऱ्या मारुती हांडे या टेंपो चालकाशी २३ वर्षाच्या संध्याचे सुत जुळले. मारुती विवाहित असूनही त्याने संध्याशी लग्न करून डोंबिवलीत राहू लागला. पण संध्याच्या जीवनात तरुण वेदांत आला आणि मारुती व संध्याच्या संसाराला ग्रहण लागले. आता संध्याला मारुतीचा अडथला वाटू लागला आणि एके दिवशी संध्या आणि वेदांतने मिळून मारुतीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.




रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मु. पुलाची वाडी, पो. किरवली येथे मारुती लक्ष्मण हांडे (५५) हा पत्नी आणि मुलांसह राहत होता. तो टेम्पो चालक म्हणून काम करीत होता. यातून मिळणाऱ्या पैशातून तो कुटूंबाचा उदरनिर्वाह करत होता. घरातील वातावरण चांगले होते. सर्व काही मजेत सुरु असताना मारुती हांडे हा संध्या सिंग (२३) नावाच्या तरुणीच्या प्रेमात पडला. मारुती आणि संध्या यांच्यामध्ये जवळीक निर्माण झाली. दोघेही परस्परांवर प्रेम करू लागली. दोघांचाही एकमेकांत जीव गुंतल्याने आणि कोणीच अर्थडा नसल्यामुळे ते परस्परांच्या सहवासात जास्तीत जास्त आनंद घेत होते. काही दिवसातच या दोघांनी लग्न केले.लग्नानंतर मारुती आणि संध्या दोघे पतीपत्नी डोंबिवली येथील बालाजी दर्शन चाळ, कोळेगांव या ठिकाणी ...पान २ वर

# मध्यस्थीचा प्रयत्न त्याच्या अंगाशी आला दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा जीव गेला



अंबड/क्राईम रिपोर्टर

आजकालजमाना खूप वाईट आहे. कुणी कुणाच्या भांडणात मध्यस्थी करू नये. कारण कधी कधी भांडणारे बाजूलाच राहतात आणि जो मध्यस्थी करायला जातो तो मात्र हकनाक जीवाला मुकतो. नाशिकच्या अंबड मधील एमआयडीसी परिसरात अशीच एक घटना घडली आहे. सोशल मिडीया वरील एका वादग्रस्त पोस्टवरून दोन तरुणांच्यात वाद झाला होता. याच वादातून संग्राम शिरसाट या तरुणाला मारहाण करण्यात आली. दरम्यान या वादात संग्रमचा मित्र परशुराम मध्यस्थी करायला गेला. त्यामुळे संग्रामला मारहाण करणाऱ्यांनी परशुरामवर हल्ला करून त्याचा जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

तरुणाईमध्ये सध्या सोशल मिडीयाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. रिल्स बनवून लाईक आणि कमेंटसाठी काहीही करण्याची तयारी तरुणांमध्ये असते. यातून तीव्र ...पान ६ वर

# पूर्ववैमन्यस्यातून डाव साधला बेसावध पेंढारकराचा जीव घेतला

नंदुरबार/क्राईम रिपोर्टर



मयत

दोन कुटुंबात जेंव्हा वाद असतात तेंव्हा ते सामंजस्याने सोडवायचे असतात. पण काही विघ्नसंतोषी लोक आगीत तेल ओतून दोन्ही कडच्या लोकांना भडकवतात. त्यामुळे वाद मिटण्याऐवजी अधिकच चिघळत जातो आणि त्यातून दोघांपैकी एकाला जीव गमवावा लागतो. नंदुरबारमध्ये राहणाऱ्या पेंढारकर आणि जावरे कुटुंबात वाद होता. या वादात ओळखीच्या लोकांनीच तेल ओतले आणि जावरे कुटुंबातील तरुणांनी रस्त्यावर बेसावधपणे उभ्या असलेल्या कृष्णाप्पा पेंढारकर यांची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.





नंदुरबारमधील डॉ. आंबेडकर चौकात वास्तव्याला असलेल्या पेंढारकर आणि चौधरी गल्लीत रहाणाऱ्या जावरे कुटुंबीयांमध्ये वर्षापूर्वी कारणपरत्वे वाद झाला. वादाचं कारण गंभीर नव्हतं, पण या वादावर पडदा टाकण्याऐवजी त्या वादाला चेतवण्याचा प्रकार हितसंबंधीयांकडून झाला. कारणपरत्वे लागलेल्या आगीत पाणी टाकून ती तात्काळ विझवण्याचा प्रयत्न झाला तर होणारं नुकसान काही प्रमाणात टाळता येते, पण आगीत तेल ओतलं तर ती अधिक प्रज्वलीत होते आणि त्यात संबंधितांची राखरांगोळी होईल हे कटु सत्य आहे. पेंढारकर आणि जावरे कुटुंबीयांतील वादाचं तसंच झालं. ...पान ६ वर

# क्रिकेटच्या मैदानावर घडली क्राईम स्टोरी ३०० रुपयांमुळे तोडली आयुष्याची दोरी

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर

सध्या देशात आयपीएलची धूम सुरु आहे. त्यामुळे मुलांमध्येही क्रिकेटचा फिव्हर आहे. मैदानात तसेच गल्लीबोलात सुद्धा क्रिकेट खेळले जातेय आणि त्यातून वादही होत आहेत. बुलढाण्याच्या मलकापूर येथील अशाच एका घटनेत क्रिकेटची बॅट तोडली म्हणून यश चव्हाण नावाच्या मुलाने सुमीत पिवाल कडून ३०० रुपये वसूल केले होते. याचा राग मनात ठेवून सुमितने याचा भर मैदानावरच खून केला. या प्रकरणी आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

सध्या देशात आयपीएल फिवर सुरू आहे. शाळा महाविद्यालयालाही उन्हाळ्याच्या सुट्टी असल्याने मैदानावरही मुलं खेळताना पाहायला मिळत आहे. खेळ म्हटलं की किरकोळ वाद आलेच. पण, याच वादातून एक धक्कादायक घटना बुलढाणा जिल्ह्यात घडली आहे. बॅट तोडली म्हणून ३०० रुपये घेतल्याने अल्पवयीन मुलाचा खून केल्याची घटना समोर आली. धक्कादायक म्हणजे आरोपी देखील अल्पवयीन आहे. या घटनेनंतर शहरात खळबळ उडाली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यात क्रिकेटच्या वादातून एका सतरा वर्षीय अल्पवयीन मुलाने दुसऱ्या एका अल्पवयीन मुलाचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मलकापूर शहरातील नूतन हायस्कूलच्या मैदानावर क्रिकेट खेळताना यश चव्हाण नामक सतरा वर्षीय मुलाची सुमित पिवाल ...पान ६ वर

# चंचल पत्नीला हवा होता रूबाबदार तरुण प्रियकराच्या मदतीने पतीला टाकले मारून



मयत दत्तात्रय

नाशिक/क्राईम रिपोर्टर

पती वयस्कर असला कि पत्नीची शारीरिक भूक भागवण्यास तो असमर्थ ठरतो. त्यामुळे पत्नी आपली गरज भागवण्यासाठी चांगल्या सशक्त तरुणाचा शोध घेऊ लागते आणि तसा कुणी मिळाला कि तिला दोघांच्या प्रेमसंबंधात पतीचा अडथला वाटू लागतो. अशावेळी प्रियकराच्या मदतीने ती पतीचा काटा काढते.



एसपी शहाजी उमाप

नाशिकच्या बागलाण तालुक्यातील लाडूद गावामध्ये बाळासाहेब सखाराम ठाकरे हे ६२ वर्षाचे गृहस्थ आपली पत्नी, मुले, सूना आणि नातवंडांसमवेत रहातात. त्यांचा मोठा भाऊ राजाराम हेही लाडूद गावामध्येच पत्नी निर्मलाबाई, मुलगा दत्तात्रय, सून माधुरी यांच्यासह रहातात. शुक्रवार दि. २४ मार्च २०२३ रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास बाळासाहेब हे लाडूद येथून त्यांच्या शेतातून टरबूज घेवून जायखेडा गावात भरणाऱ्या आठवडा बाजारात विक्रीसाठी आले. तेथे आल्यावर त्यांचा मुलगा युवराज याचा फोन आला. त्याने फोनवर जे सांगितलं ते ऐकून त्यांना धक्काच बसला. त्यांचा पुतण्या युवराज याचा खून झाला असल्याचा तो निरोप होता. त्यांनी बाजारात विक्रीसाठी आणलेला टरबूजचा माल तेथेच ठेवून ते जायखेडा गावाच्या दिशेने घटनास्थळाकडे निघाले. दरम्यान घटनास्थळावर लोकांची गर्दी जमली होती. या घटनेची माहिती समजताच जायखेडा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पुरूषोत्तम शिरसाठ, उपनिरीक्षक वाघमारे आणि कर्मचा-यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पंचनाम्याचे काम सुरू केले. मृतकाच्या खिशामध्ये एक औषधाची चिठ्ठी सापडली. त्यामध्ये त्याचे नाव होते, त्यामुळे ...पान २ वर

01 TO 07 MAY 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 4/29/2023 9:49 PM Page 1



पान १ वरून...

## चारित्र्याच्या संशयामुळे कुटुंब उद्धवस्त ...

दारू पिऊन आला की घरात तो पत्नी प्रियांका बरोबर भांडण काढत तिला मारहाण करीत होता. त्याची पत्नी प्रियांका ही दिसायला देखणी आणि सुंदर होती. ती चार मुलांची आई असली तरी तिची फिगर ही चार चौघात उठून दिसत होती. अलिकडे तिच्या वागण्या बोलण्यात आणि राहणीमानात त्याला फरक जाणवत होता. ती सारखी आपल्या फोनवरून कुणाशी तरी बोलत असायची. ती कोणाबरोबर काय बोलते याची बिराप्पा खातर जमा करीत होता. त्यातच त्याला समजले की वस्तीवरील आपल्या भावकीतील एका तरूणाबरोबर तिचे प्रेमसंबंध आहेत. याकारणातून तो दारू पिऊन येवून सारखा तिच्याबरोबर भांडण काढत तिच्या चारित्र्यावर तो शितोंडे उडवित होता. खरे तर प्रियांका ही तशी नव्हती. तिचा स्वभाव हा मनमोकळा आणि हसत खेळत होता. ती कोणाबरोबर ही बोलताना हसत खेळत बोलत असायचा याचा वेगळचा अथे बिराप्पा हा काढत होता. ती आपल्या भावकीतील तरूणाला चिकटली आहे. त्याच्याबरोबर ती मजा मारत असते असा विचार तो करीत होता. भांडणात तिने त्याला बऱ्याच वेळेला समजावून ही सांगितले होते की, ती त्यातील बाई नाही. तिचे कोणाबरोबर कसले संबंध ही नाहीत तरी ही बिराप्पा हा तिच्यावर विश्वास ठेवायला तयार नव्हता. त्याच्या मनात तिच्या चारित्र्याचा संशय घोळत होता. दारू पिऊन आले की तिच्याबरोबर भांडण काढून तिला मारहाण करणे आणि तिच्या चारित्र्यावर संशय घेणे असा प्रकार तो करीत होता. देखणी बायको दुसऱ्याची असते हा विचार त्याच्या मनात घर करून राहिला असल्याने त्या विचाराने त्याचे डोके पोखरले होते. काही केल्या त्याच्या डोक्यातून तो विषय जात नव्हता.या दोघा नवरा बायकोची भांडणे बऱ्याच वेळेला नातेवाईकांनी सोडवली होती. त्याने तिच्या वागण्याबाबत तिच्या माहेरच्या लोकांना ही सांगितले होते. त्यामुळे ती भांडण झाले की रागाच्या भरात आपल्या माहेरी खैराव येथे जात होती. तिच्या भावाने ही बिराप्पाला बऱ्याचवेळेला समजावून सांगून पाहिले होते. घरात सगळे ऐश्वर्य असताना त्याची विपरीत बुध्दी झाली होती. तो कोणत्याही पाहुण्याचे सांगून ही ऐकत नव्हता. त्याच्या मनातील संशय काही केल्या जात नव्हता. ती बिचारी त्याचा मार खावून मुलांच्याकडे बघून आपल्या संसाराचा गाडा कसा बसा हाकत होती. त्याच्या दररोजच्या भांडणाने मुले ही त्रस्त झाली होती. मागील काही दिवसापूर्वी ती नवऱ्याबरोबर भांडून आपल्या माहेरी गेली होती. त्यावेळी भावाने आणि नातेवाईकांनी तिला समजावून सांगितल्याने ती परत कुणीकोणुर येथे आली होती. रविवार दि.२३ एप्रिल रोजी दुपारी गावाशेजारील गावात हुडीबाबाची जत्रा चालू असल्याने त्याची दोन नंबरची मुलगी आणि दोन्ही मुले जत्रेला गेली होती. तर त्याची आई जवळच्या नातेवाईकाडे गेली होती. त्यामुळे घरात मोठी मुलगी मोहिनी आणि प्रियांका या दोघीच होत्या.गावाशेजारील गावात जत्रा असल्याने दुपारपासूनच बिराप्पा हा दारू पिऊन ताईट होता. रात्री ८ वाजणेच्या सुमारास तो घराकडे दारू पिऊनच आला. त्याची बायको प्रियांका ही घरकामात व्यस्त होती.तर मुलगी मोहिनी ही जवळच असलेल्या घराशेजारील कुपनलिकेवर पाणी आणण्यासाठी गेली होती.प्रियांका ही जेवण कण्यात मग्न असताना तो दारूच्या नशेत तिच्या जवळ येवून तिला शिवीगाळ करीत तु आज घरात कुणी नसताना एकटीच काय करीत होतीस. तुझा यजमान आला होता काय म्हणत तिच्या बरोबर भांडण काढत तिच्या झिंज्या धरून तिला मारहाण करीत होती. ती त्याला मला सोडा मी काय तुमचे केले आहे हो म्हणत आरडा ओरडा करू लागली. तो तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला घाणेरडया शिव्या देवू लागला.त्याच्या पोटात आक्काबाई शिरली असल्याने त्याच्या डोक्यात वेगळाचा विचार होता. आज हिचा विषय संपवायचाच असा त्याने विचार केला होता. घरात आज कुणीच नसल्याने त्याला तशी संधी ही होती. भांडणात त्याने तिचा जोरात गळा आवळून धरला.ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होती पण त्याने आपले दोन्ही हात मोठया ताकदीने लावल्याने तिला कसलीच हालचाल करता येत नव्हती. तशातच त्यानेजवळच पडलेली दोरी घेतली आणि तिच्या गळयाभोवती त्या दोरीचा फास टाकला आणि आपली ताकद लावली. त्यावेळी त्याच्या ताकदीपुढे ती हतबल झाली. त्याने जोरात तिचा गळा दाबून धरल्याने काही क्षणातच ती टाचा घासू लागली. तिची हालचाल मंदावली होती. एवढयात कुपनलिके वर पाणी आणण्यासाठी गेलेली मोहिनी पाण्याची घागर घेून घरात आली. वडिल आपल्या आईचा गळा आवळत असल्याचे बघून तिने ही आरडा ओरडा करायला सुरूवात केली. हे बघून बिराप्पा भानावर आला आता ही मुलगी गावभर बोंब ठोकणार म्हणून त्याने लगेच तिच्याच गळयातील ओढणीने गळा आवळयाला सुरूवात केली. ती ही जागीच निपचिप झाली. एकाच वेळी त्याने माय लेकीना गळा आवळून संपविले होते. त्यानतर तो भानावर आला. त्याच्या हातून दुहेरी खूनाची घटना घडली होती. आता आपले काही खरे नाही असा त्याने विचार केला. रात्रीच्या अंधारात त्याने आपल्या ट्रॅक्टर ट्रालीमध्ये दोघीचा मृतदेह टाकले आणि आपल्या शेतातील झोपडीत आणून टाकले. आणि गावात येवून बोंब ठोकली की आपल्या बायकोचा आणि मुलीला शेतातील झोपडीत कुणी तरी मारून टाकले आहे. त्याने अशी बोंब ठोकल्याने वस्तीवरील लोकांनी जवळच असलेल्या त्याच्या शेताकडे धाव घेतली. झोपडीत प्रियांका आणि मोहिनी याचे मृतदेह पडले होते. ही घटना गावातील लोकांना समजल्यावर त्यांनी ही घटनास्थळी घाव घेतली. त्यावेळी रात्रीचे १०.३० वाजले होते. या घटनेची माहिती पोलीस पाटील तानाजी कृष्णदेव पाटील यांना देण्यात आल्याने त्यांनी ही घटनास्थळी येवून पाहणी केली आणि या घटनेची माहिती उमदी पोलीस स्टेशनला दिली. ही घटना माहिती झाल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी घटनेचा आणि दोन्ही मृतदेहांचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी उमदी येथील सरकारी दवाखान्यात पाठवून दिले. या घटन विषयी कुणीकोणुर गावात उलट सुलट चर्चा होऊ लागली होती. सोमवार सकाळी घटनास्थळी जत विभागाचे प्रभारी पोलीस उप विभागीय अधिकारी अश्विनी शेंडगे यांनी भेट देवून घटनेची पाहणी केली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना देऊन संशयीत आरोपीला लवकरात लवकर जेरबंद करण्यास सांगितले. तो पर्यत पोलीसांच्या हाती शवविच्छेदनाचा रिपोर्ट लागला होता. त्यामध्ये दोन्ही मृतदेहांचा गळा आवळ्याने मयत असे नमूद केले होते. सोमवार सकाळी मयत प्रियांकाचा भाऊ संतोष चौगले यांनी उमदी पोलीस स्टेशनला तक्रार दिली की मयत प्रियांका हिच्यावर तिचा नवरा बिराप्पा हा सारखा तिच्या चारित्र्याचा संशय घेत होता. त्यानेच तिचा व आपल्या भाचीचा गळा आवळून खून केला आहे. त्यांनी दिलेल्या तक्रीवरून पोलीसांनी संशयीत बिराप्पा याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने आणि संतोष चौगुले यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार प्रियांका बिराप्पा बिळुंखे (वय ३२) आणि मोहिनी बिराप्पा बेळुंखे (वय १२) याच्या खून प्रकरणी बिराप्पा नाना बिळुंखे (वय ३६) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला जत येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली दोरी आणि ट्रॅक्टर जप्त केला. या घटनेचा तपास स.पो.निरी पंकज पवार याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक लक्ष्मण खरात यांनी केला.संशयाने मन पोखरले गेले की संसाराचा राहट गाडा बिघडतो आणि कलहाने भरला संसार ही उध्दवस्त होतो हेच या घटनेवरून दिसून येते.

## चंचल पत्नीला हवा होता रूबाबदार तरुण...

पोलिसांना हा मृतदेह दत्तात्रय ठाकरे याचा असल्याचे समजले. पोलिसांचे अर्धे काम फत्ते झाले होते. पंचनाम्याचे काम सुरू असतांनाच बाळासाहेब ठाकरे हे घटनास्थळी पोहोचले, तेंव्हा त्याठिकाणी पोलीस आलेले त्यांना दिसले. पोलीस आपले काम करत असतांनाच बाळासाहेब ठाकरे हे मृतदेहाजवळ गेले. त्यांनी मृतदेहाची पहाणी केली असता तो मृतदेह त्यांच्या पुतण्याचाच असल्याचे समजून आले. त्याच्या डोक्यावर गंभीर जखमा झालेल्या होत्या. डोक्यातून मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव होवून जमिनीवर रक्ताचे थारोळे साचलेले होते. घटनास्थळाजवळ मृतदेहापासून काही अंतरावर एक दगड पडलेला होता, त्याला रक्त लागलेले होते. पुतण्याची अवस्था पाहून त्यांना रहूच कोसळले. पोलिसांनी त्यांना 'याला ओळखता का?' असे विचारले असता त्यांनी 'हा माझा पुतण्या हाय' असे पोलिसांना सांगितले. मृतकाची खात्रीलायक ओळख पटली होती. पोलिसांनी बाळासाहेब ठाकरे यांना फिर्याद देण्याबाबत सांगितले, त्यानंतर मृतदेह पोस्टमार्टमसाठी रूग्णालयात रवाना करण्यात आला. या घटनेने जायखेडा परिसरात एकच खळबळ उडाली. दत्तात्रय याचा खून कोणी व का केला असावा याची चर्चा रंगली. मृतदेह स्थानिक नसल्याने तेथे उपस्थित असलेल्या लोकांना ओळखता आला नाही, पण मयताचे चुलते तेथे हजर झाल्याने मृतदेहाची ओळख पटली होती. दरम्यान बाळासाहेब सखाराम ठाकरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जायखेडा पोलीस ठाण्याला गुन्हा रजि नं. ११७/२०२३ नुसार भा.दं. वि. कलम ३०२ नुसार अज्ञात मारेकऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. दत्तात्रय यास कोणीतरी अज्ञात इसमांनी काहीतरी कारणावरून त्याच्या डोक्यावर दगड मारून गंभीर दुखापत करून त्यास जीवे ठार मारले असे त्यांनी फिर्यादीत नमूद केले. मोसम नदीकिनारी असलेल्या अमरधामच्या पाठीमागील तार कंपाऊंडलगत आया माऊलीच्या शेजारी दत्ताच्यचा मृतदेह मिळून आला होता. त्यामुळे तर्क–वितर्क लावले जात होते. दरम्यान या घटनेची माहिती वरीष्ठांना देण्यात आली. पोलीस अधीक्षक शहाजी उमाप, अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती, उपअधीक्षक पुष्कराज सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शिरसाठ, उपनिरीक्षक वाघमारे यांनी तपासाला सुरूवात केली. खबरे व बातमीदारांना माहिती काढण्याच्या कामगिरीवर पाठवण्यात आले. या प्रकरणात दत्तात्रय याचा घातपात केल्याचा संशय पोलिसांना येत होता, त्यामुळे पोलिसांनी दत्तात्रय याच्या घरातील सगळ्यांचे कॉल डिटेल्स मागवले. त्यामध्ये दत्तात्रय याची पत्नी माधुरी हिच्या कॉल डिटेल्सबाबत पोलिसांना शंका आली. पोलिसांनी माधुरी ठाकरे हिला ताब्यात घेतले. तिची चौकशी केली. सुरुवातीला आपण त्यातले नाहीच' असा आविर्भाव दाखवणारी माधुरी नंतर बोलती झाली. माधुरी दत्तात्रय ठाकरे ही २५ वर्षाची तरुणी होती. तिचे नंदुरबार जिल्ह्यातील आसने या गावातील भरत इलाचंद्र पाटील (वय ३१) या तरुणाबरोबर प्रेमसंबंध होते. माधुरीचे मन संसारात रमत नव्हते. तिचा पती चाळीशीचा होता, तर ती अवधी पंचविशीत होती. तिला जास्त वयाच्या नवऱ्याबरोबर संसार करण्यात रस नव्हता. या उलट तिशीतला भरत तिला आवडत होता. तोही तिच्यावर जीव ओवाळून टाकत होता. तिच्याशी लग्न करण्याची तयारीही त्याने केली होते. माधुरी आणि भरत लग्न करून संसार थाटण्यास उत्सुक होते. पण त्यामध्ये एकच अडचण होती, ती म्हणजे माधुरीचा पती दत्तात्रय, आपल्या प्रेमसंबंधात नवरा अडथळा ठरतो हे तिच्या लक्षात आल्यानंतर तिने याबाबत प्रियकर भरतला सांगितले, तेंव्हा त्या दोघांनी दत्तात्रयचा काटा काढण्याचा निर्णय घेतला. भरतचे नेहमीच घरी जाणे येणे होते. त्यामुळे भरत आणि दत्तात्रयची ओळख होती. या ओळखीचा गैरफायदा घेत भरत पाटीलने दत्तात्रयला गोड बोलून आपल्यासोबत जेवणासाठी म्हणून निर्जनस्थळी नेले. तिथे त्याला भरपेट दारू पाजली. तो नशेत झिंगू लागल्यावर त्याचा गळा दाबून खून केला. खून तर केला, पण मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न समोर उभा राहिला. एकदा मृतदेह ठिकाणी लागला की मग कशाचीच चिंता नव्हती. तेंव्हा भरत पाटीलने राकेश पावबा साबळे (१८) याची मदत घेण्याचे ठरवले. त्याने राकेशला दुचाकी घेऊन बोलवले. राकेश आल्यानंतर त्याच्या दुचाकीवर मध्यभागी दत्तात्रयचा मृतदेह बसवला. गाडी राकेश चालवत होता. दत्तात्रयला मध्यभागी धरून भरत पाटील त्याच्यामागे बसला. ते तसेच जायखेडा येथील अमरधामलगत असलेल्या मोसम नदीकाठी आणली. तेथे कोणी नसल्याचे पाहून मृतदेह तिथे टाकला. मृतदेहाची ओळख पटू नये म्हणून त्याच्या डोक्यात दगड टाकून चेहऱ्याचा चेंदामेंदा केला. तिथून ते पसार झाले. पत्नीचेच अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा आपल्या प्रियकर आणि त्याच्या साथीदाराच्या मदतीने खून केला. पोलिसांनी चातुर्याने तपास करत या गुन्ह्याचा अवघ्या आठ तासांत छडा लावला. सध्या पोलिसांनी माधुरी ठाकरे आणि भरत पाटील यांना अटक केली आहे.

## दारूच्या नशेत संपत भयंकर चिडला...

काही तरी करून करूया पण तु नीट राह असे सांगितले होते. पण संपतला दारूची इतकी चटक लागली होती की त्याला त्याच्या शिवाय चैन पडत नव्हती. त्यामुळे डॉ.अनिल शिंदे हे घराची आणि शेतीची वाटणी ही करीत नव्हते. त्यांना भिती वाटत होती की व्यसनापायी संपत हा घर आणि जमीन विकून खाईल. संपत याचा स्वभाव रागीट आणि भांडखोर होता. तो हल्ली दारू पिऊन आला की डॉक्टरांच्या बरोबर भांडण काढत होता. त्यामुळे एकदा दोनदा डॉक्टरांनी त्याला चांगले झापले होते. त्याला मार ही दिला होता.भांडणात संपत हा माझी मला वाटणी दे, मी त्याचे काही ही करीन असे सांगत होता. त्याची बहिण ही कुपवाडमधील शिवशक्तीनगर मध्ये राहयला आहे.तिने ही संपत याला समाजावून सांगितले होते. दोघा भावात कलह वाढत चालला होता. संपत हा कधी दवाखान्यामध्ये तर कधी घरामध्ये जावून डॉक्टरांशी वाद घालत होता. त्यामुळे डॉक्टरांची मनस्थीती ही बिघडत चालली होती. त्यांना ही काही सुचत नव्हते. यातून मार्ग कसा काढयाचा याचा ते विचार करीत असताना त्यांनी अध्यात्माचा मार्ग स्विकारला होता. त्यातून त्यांना मनशांती मिळत होती. सकाळी १० वाजता आपल्या दवाखान्यात जाण्या अगोदर ते घरात देवपुजा करीत असताना ज्ञानेश्वरीचा अध्याय वाचत होते. त्याचा हा नित्यक्रम दररोज चालू असायचा. त्याची मुले ही लहान असल्याने त्यांनी त्यांना कुपवाड येथेच शाळेला घातले होते.त्यांची पत्नी ही सरस्वती ही एका बॅंकेत काम करीत होती. त्यांना ही चांगला पगार असल्याने त्याचे सर्वकाही व्यवस्थीत आणि सुरळीत चालले होते.आपण ही एक मोठी ओपीडी काढावी अशी डॉक्टरांची इच्छा होती परंतु घरच्या कलहाने ते इतके बेजार झाले होते की त्यांना काही करताच येत नव्हते.तरी ही ते आपली मनस्थीती व्यवस्थीत ठेवीत आपले काम करीत असायचे. तर इकडे संपतच्या मनात दुसरेच काही तरी होते. आपला भाऊ डॉक्टर असून ही आपले लग्न करीत नाही. तो फक्त आपली बायको, मुले यातच मशगुल झाला आहे. त्याला आपली काळजी नाही, ना आपल्या आईची काळजी असे त्याला वाटत होते. हल्ली संपत हा दारू पिऊन येऊन डॉक्टरांशी भांडण काढत होता. त्यामुळे त्याला डॉक्टरांनी तु माझ्याकडे येत जावू नकोस. मला व माझ्या कुटूंबाला त्रास देवू नकोस असे बजावले होते. संपत त्याच्याशी भांडण काढत असल्याने डॉक्टरांच्या जवळच्या लोकात त्याच्या विषयी नको ते बोलले जात होते. ते डॉक्टरांना नको होते. त्यामुळे त्यांनी संपतला बऱ्याचदा समज दिली होती पण तो काही त्याचे ऐकत नव्हता.त्याला घराची आणि शेतीची वाटणी पाहिजे होती. तो सुधारावा चांगले वागावा म्हणून डॉक्टरांनी त्याला दोन वर्ष आपल्या जवळ ही ठेवून घेतले होते. पण तो काही सुधारत नव्हता. त्यामुळे गेल्या पाच सहा महिन्यापूर्वी त्यांनी संपतला गावी वडगाव येथे जा आणि काही तरी कामधंदा कर जा असे सांगितले. त्यावेळी चिडून संपत हा डॉक्टराच्या घरातून निघून गेला होता. डॉक्टरांनी वहिनीच्या सांगण्यावरूनच आपल्याला त्याच्या घरातून बाहेर काढले आहे असा समज त्याचा झाला. त्यामुळे तो त्याचेवर जास्त चिडून होता. तो हल्ली वडगाव येथे राहत असल्याने तो कोणाच्या बंधनात नव्हता. त्याला रान मोकळे होते. वयोवृध्द आई त्याला अडवू शकत नव्हती. त्यामुळे सकाळ पासून रात्री पर्यत दारू प्यायचे एवढेच तो करीत होता. त्याने डी.फॉर्मसी केल्याने त्याला चांगल्या ठिकाणी नोकरीची संधी होती पण तो घरच्या कलहाने वैतागून नोकरी ही करीत नव्हता. त्याने जरी एमआर म्हणून काम केले तरी त्याचे काही बिघडणार नव्हते. पण त्याची काम करण्याची सवयच मोडली होती. त्याला फक्त आपले लग्न कधी होईल असे वाटत होते. पण काही करून लग्न जमत नसल्याने तो ही हताश झाला होता.त्याचा स्वभाव चिडखोर आणि भांडखोर असल्याने त्याचा तो स्वभावच याला नडत होता.त्याच्या मनात डॉक्टराविषयी राग आणि द्वेष निर्माण झाला होता. त्यानेच आपले वाटोळे केले आहे आपल्या आजच्या परिस्थीतीला तोच जबाबदार आहे त्याला चांगलीच अद्दल घडवायची याचा त्याने विचार केला. डॉ.अनिल शिंदे हे पत्नी मुलासह कुपवाड मिरज रस्त्यालगत असलेल्या महादेव मंदिरसमोरील माऊली अपार्टमेंटमधील तिसऱ्या मजल्यावर राहत होते. मंगळवार संध्याकाळी तो वडगाव येथून कुपवाड येथील शिवशक्ती नगरमध्ये आपल्या बहिणीकडे आला होता. त्याने त्यावेळी दारू फुल्ल पिली होती. तो दारूच्या नशेत आपल्या बहिणीला सांगत होता की मी अन्याला आता सोडणार नाही त्याला चांगली अद्दल घडविणार तो समजतो काय स्वतःला असे म्हणत होता. त्यावेळी त्याच्या बहिणीने ही त्याला समजावून सांगत तु नीट वाग. नाही ते खुळ डोक्यात ठेवू नकोस असे सांगितले होते. पण त्याच्या डोक्यातून काही डॉक्टरांच्या विषयीचा राग जात नव्हता. बुधवार दि.२६ रोजी तो सकाळी ८.३०च्या दरम्यान शिवशक्तीनगर येथील आपल्या बहिणीच्या घरातून निघाला ते तडक डॉक्टर राहत असलेल्या माऊली अपार्टमेटच्या तिसऱ्या मजल्यावर आला. अपार्टमेंटमधील जवळपास सर्वाच्या प्लॅटचा दरवाजा बंद असतो त्याचप्रमाणे डॉक्टराच्या ही प्लॅटचा दरवाजा बंद होता. घरात डॉक्टरांची पत्नी सरस्वती या कामाला जाण्यापूर्वी किचन घरात स्वयंपाक कामात व्यस्त होत्या. दोन्ही मुलांना शाळेला सुट्टी असल्याने ते ही आईने बनवलेला नाश्ता करीत होते. तर डॉक्टर हे सकाळी आपल्या दवाखान्यात जाण्यापूर्वी आपले नित्यक्रम करून देवपुजेला लागले होते. देवघरात ते खाली मान घालून ज्ञानेश्वरी वाचण्यात मग्न असताना त्याच्या प्लॅटच्या दरवाज्यावर कुणी तरी लाथा घालीत होते. ओरडत होते पण ही घटना डॉक्टरांना किंवा त्याच्या पत्नी सरस्वती यांना लक्षात आली नाही ते दोघे ही आपआपल्या कामात मग्न होते. सरस्वतींना बॅंकेत जाण्याची घाई होती तर डॉक्टरांना देवपुजा करून दवाखान्यात जाण्याची घाई लागली होती. त्यामुळे आपले नित्यक्रम आटोपण्यात दोघेही मग्न असल्याने त्याचे दुसरीकडे लक्ष नव्हते. इकडे दरवाज्यावर संपत हा लाथा मारीत ओरडत होता. कुठे आहे तो अन्या त्याला मी आता सोडणार नाही म्हणत होता. शेजाऱ्यांना ही त्याच्या दोघांतील भांडण माहित असल्याने त्यांनी तिकडे दुर्लक्षच केले होते. शेवटी लाथा मारत संपतने तो दरवाजा मोडून काढला आणि कुठे आहे तो अन्या म्हणत देवपुजा करीत असलेल्या डॉक्टरांच्या खोलीत शिरला. डॉक्टर हे ज्ञानेश्वरी वाचत खाली मान घालून बसले होते. त्याचे ओरडणाऱ्या संपतकडे लक्ष नव्हते. ज्ञानेश्वरीचा अध्याय पुर्ण वाचल्याखेरीज ते मान वर काढत नव्हते. त्यावेळी ही तसेच झाले. संपत रागाच्या भरात विळा घेऊनच आत शिरला होता. त्याच्या डोकीत सैतान संचारला होता. कुठे आहे अन्या म्हणत त्याने रागाच्या भरात खाली मान घालून ज्ञानेश्वरी वाचत असलेल्या डॉक्टरांच्या मानेवर विळ्याने सपा सप वार केले. त्याच्या मानेतून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव सुरू झाला. त्याने कमीत कमी ७ ते ८ वेळा त्याचेमानेवर वार केल्याने आणि ते वार वर्मी बसल्याने जागेवरच डॉक्टर रक्ताच्या थारोळ्यात पडले. हे बघून त्यांची दोन्ही मुले भेदरली होती. तर डॉक्टरावर वार करीत असलेल्या आपल्या दीराला बघून डॉक्टरांच्या पत्नी सरस्वती यांनी ही ओरडा करायला सुरूवात केली. त्या ओरडत असताना संपत हा त्यांना ही मारायला त्याच्या अंगावर धावून गेला. पण त्यांनी प्रंसागावधान राखत आपल्या दोन्ही मुलांना घेऊन त्यांना अपार्टमेंटच्या बाहेर ओरडत खाली आल्या. त्यावेळी त्याच्या घरात काही तरी विपरीत घडले असल्याचे शेजाऱ्यांना कळून चुकले. इकडे डॉक्टरांना मारून संपत हा तेथून दुसऱ्यां मार्गाने निघून गेला. घाबरलेल्या सरस्वती यांनी घरात काय घडले आहे याची रडत माहिती शेजाऱ्यांना दिली. अपार्टमेंटमधील शेजाऱ्यांनी डॉक्टरांच्या रुममध्ये जावून पाहिले तर डॉक्टर हे रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. बाजूलाच रक्तात माखेलेली ज्ञानेश्वरी ही होती.एकाने या घटनेची माहिती लगेच कुपवाड एमआयडीसी पोलीसांना दिली. सकाळ सकाळी खूनाची माहिती मिळाल्याने पोलीसांनी ही तातडीने घटनास्थळ गाठून घटनेची माहिती घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी सांगली येथील सरकारी दवाखान्यामध्ये पाठवून दिला. कुपवाडमध्ये डॉक्टरांचा खून झाल्याची माहिती समजाताच लोकांनी ही घटनास्थळी गर्दी केली. या घटनेची माहिती मयत डॉ.अनिल शिंदे यांच्या पत्नी सरस्वती शिंदे यांनी या घटनेची माहिती कुपवाड एमआयडीसी पोलीसांना देवून ही घटना कुणी आणि कोणत्या कारणातून केली याची माहिती दिली. त्यामुळे पोलीसांना या घटनेतील संशयीत आरोपी कोण आहे याची माहिती मिळाली. पळून गेल्या संपत शिंदे याचा शोध घ्यायला सुरूवात केली. घटनेनंतर तो कुपवाड येथील शिवशक्तीनगर येथील बहिणीच्या घरी असल्याची माहिती मिळाल्याने पोलीसांनी त्याला तेथून ताब्यात घेतले. त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची महिती दिली.मयत डॉक्टरांच्या पत्नी सरस्वती शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार डॉ.अनिल बाबाजी शिंदे (वय ४३) यांच्या खून प्रकरणी त्याचा भाऊ संपत बाबाजी शिंदे (वय ३५) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याला सांगली येथील कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने त्याला दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनवाली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला विळा जप्त केला.या घटनेचा तपास पो.निरी.अविनाश पाटील, पो.उप.निरी.विश्वजीत गाडवे यांनी केला. व्यसनी व्यक्ती अति आहारी गेली की तो वैफल्यग्रस्त होतो आणि त्याच्या डोक्यात नको नको विचार येतात आणि त्याच्या हातून नको ती घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## माथेफिरू बापच बनला साप...

लहान मुलाचा बुडून मृत्यू झालाय. शुक्रवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. कौटुंबिक वादातून नशेत असलेल्या पित्याने पोटच्या मुलांनाच विहिरीत फेकल्याची माहिती आहे. या धक्कादायक घटनेने छत्रपती संभाजीनगर हादरलं आहे. या घटनेत मोठ्या मुलाला वाचवण्यात स्थानिकांना यश आले. मात्र ७ वर्षाच्या चिमुकल्याचा या घटनेत मृत्यू झाला. राजू प्रकाश भोसले (३५) असे याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या पित्याचे नाव आहे. या घटनेत नऊ वर्षाचा शिवम बचावला असून त्याचा लहान भाऊ श्रेयसचा (७) पाण्यात बुडून मृत्यू झाला. आरोपी राजू भोसले याला पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास करण्यात येत आहे.

## सुंदर संध्याने म्हाताऱ्याला पटवले...

राहू लागली. गेल्या १ वर्षापासुन ते पतीपत्नी म्हणून राहत होते. याच चाळीत वेदांत उर्फ गुड्डु शेट्टी (२२) नावाचा तरुण राहत होता.तो मारुती पेक्षा जवान होता. त्यामुळे संध्याची त्याच्यावर नजर पडली.ती वेदांतला निरखून पाहू लागली. एकाच चाळीत असल्याने दोघांची नजरेला नजर भिडली. आणि काही दिवसातच सध्या वेदांतच्या प्रेमात पडली. या दोघांचे ही अनैतिक संबंध सुरू झाले. या अनैतिक संबंधची माहिती संध्याचा पती मारुती हांडे यास माहिती पडले. यावरून मारुती आणि संध्या सिंग यांचेत भांडणे होऊ लागली. मारुतीने अनेक वेळा संध्या सिंग हिस समजविण्याचा प्रयत्न केला. परंतु तिचे व वेदांत शेट्टी यांचेतील प्रेमसंबंध चालुच राहिले होते. त्यामुळे मारुती हांडे हा नेहमी संध्या सिंग हिचेशी वाद घालू लागला. परंतु ती काही ऐकत नव्हती. नंतर मारुतीने वेदांत शेट्टी याला ही समजून सांगितले. पण तो ही संध्याच्या आहारी गेल्याने ऐकत नव्हता. मारुती आणि वेदांतच संध्या वरून एकदोनदा वाद ही झाला.दोघांनी ही एकमेकांना पाहून घेण्याची धमकी दिली. परंतु मारूतीने ते फारसे मनावर घेतले नाही. इकडे संध्या सिंग व वेदांत शेट्टी यांनी त्यांच्या प्रमातील अडसर दुर करणेसाठी मारुती हांडे यास जीवे ठार मारण्याचा प्लान केला. दिनांक २२ एप्रिल रोजी मारुती हांडे हा दुपारी त्याच्या घरात जात असताना, वेदांत शेट्टी याने स्टंम्पने मारुती हांडे याचे डोक्यावर, हातावर, पायावर, जोरात फटके मारले .यावेळी चाळीत कोणी नव्हतं.याच संधीचा फायदा घेऊन वेदांतने मारुतीला मारायला सुरुवात केली. यावेळी संध्या सिंग हि मारुती हांडे यास मारण्यासाठी प्रोत्साहन देत होती.दरम्यान वेदांत शेट्टी याने मारुती हांडे याचे डोक्यात जोरात उपट घालून त्यास गंभीर जखमी केले. त्यानंतर संध्या सिंग हिने वेदांत शेट्टी याच्या मदतीने मारुती हांडे यास ज्ञानदेव मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पीटल, कोळेगांव येथे औषधउपचारसाठी दाखल केले. यावेळी संध्या हिला डॉक्टरांनी मारुती याला कोणी मारहाण केली अशी विचारणा केली असता, तिने वैद्यकीय अधिकारी यांना काहीही माहिती देण्यास नकार दिला. मारुती हांडे यास झालेल्या जखमा या गंभीर स्वरूपाच्या असल्याने त्यास पुढील उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथे पाठविण्यात आले. त्यावेळी संध्या सिंग हिने मारुती हांडे याच्या पत्नीस फोन करुन मारुती हांडे यास कोणीतरी मारहाण केली असुन, त्यास कळवा येथे हॉस्पीटलमध्ये दाखल केले आहे,तुम्ही ताबडतोब कळवा येथे या, अशी विनंती केली .त्यानुसार मारुती हांडे याची पत्नी, मुलगा व भाऊ असे हॉस्पीटलमध्ये आले. संध्या सिंग हिने मारुती हांडे यास कोणी मारले याची काही माहिती न देता जखमीचे केस पेपर मारुती हांडे याचे पत्नीकडे देवुन हॉस्पीटलमधुन गुपचुप निघून गेली. जखमी मारुती हांडे यास झालेल्या जखमा या गंभीर असल्याने, त्यास पुढील उपचारासाठी सर जे. जे. रुग्णालय, मुंबई येथे पाठविण्यात आले. तेथे त्याचेवर उपचार चालु असताना तो दिनांक २३ एप्रिल रोजी पहाटे ०५:१५ वा. मयत झाला.या घटनेची माहिती मानपाडा पोलीस ठाण्याच्या मिळालेनंतर, या गुन्हयाचा प्रकार हा गंभीर असल्याने, वपोनिरी. शेखर बागडे यांनी लागलीच गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या ३ टिम तयार करुन आरोपींचा शोध घेणेसाठी रवाना केले. संध्या सिंग व वेदांत शेट्टी यांचा त्यांचे पत्यावर शोध घेतला असता ते त्यांचे घरी मिळुन आले नाहीत. या दोघांचा वेगवेगळया पध्दतीने शोध घेण्यात आला.परंतु त्यांचा कोणताही सुगावा लागला नाही. पोलीस पथके या दोघांचा शोध घेत असताना, डोंबिवलीतून अथक प्रयत्नांनी त्यांना ताब्यात घेण्यात आले. पोलीस ठाण्यात आणून त्यांचेकडे केलेल्या चौकशीत त्यांनी आमच्या प्रेमसंबंधात मारुती हांडे हा अडथळा निर्माण करीत असल्याने, त्यांनी त्याचा खुन केल्याची कबुली दिली. पोलिसांनी या दोघांना अटक केली. ही कामगिरी अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ कल्याण सचिन गुंजाळ, सहा. पोलीस आयुक्त (डोंबिवली विभाग) सुनिल कुराडे, वपोनि शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनिरी. गुन्हे बाळासाहेब पवार, सपोनिरी. सुरेश डांबरे, सपोनि. अविनाश वनवे,सुनिल तारमळे, भानुदास काटकर, पोहेकॉ . सोमनाथ टिकेकर, सुनिल पवार, संजय मासाळ, पोहेकॉ. शिरीष पाटील, पोना. प्रविण किनरे,अनिल घुगे, गणेश भोईर, पोकॉ.अशोक आहेर, विजय आव्हाड यांनी। पार पाडली.

01 TO 07 MAY 2023 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 4/29/2023 9:50 PM Page 1



# देशाच्या आणि राज्याच्या उद्योग क्षेत्राच्या वाढीच्या मोजमापात उद्योजकांनी योगदान द्यावे-विजय आहेर

**पालघर/प्रतिनिधी**




वार्षिक उद्योग पाहणी (Annual Survey of Industries) हा उद्योगविषयक (संघटित क्षेत्र) महत्वपूर्ण आकडेवारीचा प्रमुख स्त्रोत आहे. या आकडेवारीचा वापर या आकडेवारीचा वापर राष्ट्रीय उत्पन्न अंदाज (GPD) तयार करण्यासाठी, औद्योगिक संरचनेचा अभ्यास करण्यासाठी व उद्योगविषयक धोरणे निश्चितीसाठी होतो. राष्ट्रीय स्तरावर सांख्यिकी कार्यालयाकडून देशातील सर्व राज्यांमधील प्रमुख उद्योगांच्या वार्षिक उद्योग पाहणीचे काम करण्यात येते तर राज्यातील उद्योग पाण्याचे काम अर्थ व सांख्यिकी संचालनालय या राज्य शासनाच्या सांख्यिकी विषयक नोडल यंत्रणेकडून करण्यात येत असून निवड करण्यात आलेल्या उद्योगांना सांख्यिकी संग्रहण अधिनियम २००८ खालील तरतुदींनुसार माहिती देणे बंधनकारक आहे. वाउपच्या क्षेत्रकामातून संकलित करण्यात येणाऱ्या माहितीची गुणवत्ता वाढवण्यासाठी व क्षेत्रकामाचा दर्जा उंचाविण्याच्या दृष्टिकोनातून २०२१ - २२ या वर्षाच्या क्षेत्रकामासाठी राज्यातील क्षेत्रीयं अधिकाऱ्यांची तीन दिवसीय कार्यशाळा नियोजन विभागाच्या अधिनस्त अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई तर्फे यशदा, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी यशदाचे महासंचालक एस. चोकलिंगम व प्रमुख पाहुणे म्हणून औद्योगिक सांख्यिकी विभागाचे उपमहानिदेशक सौम्य चक्रवर्ती, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, कोलकाता, राष्ट्रीय नमुना पाहणी विभागाच्या पुणे येथील क्षेत्रीय कार्यालयाचे संचालक आलोककुमार, उद्योग विभागाचे प्रतिनिधी पुणे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक पी.डी. रेंदाळकर आणि अर्थ व सांख्यिकी संचालनालनाचे संचालक विजय आहेर आदी उपस्थित होते. राज्यातील प्रादेशिक सांख्यिकी कार्यालयांचे डॉ. किरण गिरगावकर, सहसंचालक व जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे सहायक संशोधन अधिकारी चंद्रकांत भगत आणि क्षेत्रकाम करणारे कर्मचारी या कार्यशाळेत उपस्थित होते. असे एकूण १६४ अधिकारी व कर्मचारी या कार्यशाळेत सहभागी झाले.

सौम्या चक्रवर्ती यांनी जगात बहुतांश देशांमध्ये वार्षिक उद्योग पाहणी घेण्यात येत असल्याचे सांगून आपल्या देशातील वार्षिक उद्योग पाहणीमध्ये सर्वात अधिक उद्योगांची पाहणी केली जात असल्याची अभिमानास्पद बाब नमूद केली व माहिती विहीत वेळेत संकलित करुन उपलब्ध करून देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विजय आहेर यांनी या प्रशिक्षणाचा पुरेपुर लाभ घ्यावा व जरी मनुष्यबळाची कमतरता असली तरी कामाचे योग्य नियोजन करून शासनासाठी व उद्योग क्षेत्रासाठी महत्त्वाची असलेली माहिती या पाहणीच्या माध्यमातून वेळेत व गुणवत्तापूर्ण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या तसेच उद्योगांनी देखील या कामी आवश्यक ते सहकार्य करावे असे आवाहन केले. यशदाचे महासंचालक चोकलिंगम यांनी देशातील सर्व्हेचा इतिहास, माहितीचे महत्त्व आणि त्याचा वापर आणि त्यामुळे होणारे अपेक्षित किंवा अनपेक्षित परिणाम याबाबत उदाहरणांसह अतिशय रंजक पद्धतीने उपस्थितांच्या ज्ञानात भर घातली. माहिती तंत्रज्ञानात होत असलेला नवनवीन प्रगतीद्वारे उपलब्ध होत असलेले आर्टिफिशियल इंटलिजन्स व मशीन लर्निंग यासारखे तंत्रज्ञान याचा विचार करून माहिती संचालनाच्या पद्धतीमध्ये देखील सुधारणा होण्याच्या दृष्टीने विचार करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. वार्षिक उद्योग पाहणीच्या कामासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रास्तविकात अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या उपसंचालक दिपाली धावरे यांनी वार्षिक उद्योग पाहणीबाबत सर्व उपस्थितांना अवगत केले. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या नवेन्दु फिरके यांनी उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचे व सर्व उपस्थित त्यांचे आभार मानले. या कार्यक्षेत्रामध्ये राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे उपसंचालक रणबीर डे व बाप्पा करमरकर, प्रख्यात अर्थतज्ञ व प्राध्यापक डॉ. प्रदीप आपटे, पुणे राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालयाच्या पुणे येथील क्षेत्रीय कार्यालयाचे उपसंचालक श्रीनिवास शिर्के आणि महेश बोरघडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे अप्पर संचालक डॉ. जितेंद्र चौधरी हे सत्र नियंत्रक व तज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संबंधित अनुभवी प्रशिक्षकांद्वारे वार्षिक उद्योग पाहणीच्या कामाचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण संगणकावर घेण्यात आले व प्रशिक्षणार्थींच्या अडचणींचे निराकरण करण्यात आले. कार्यशाळेच्या समारोपाच्या कार्यक्रमासाठी पुणे यशदाचे उपमहादेशक डॉ.मल्लीनाथ कलशेट्टी हे अध्यक्ष व अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे अप्पर संचालक पुष्कर भगूरकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# भिवंडीत माहिती अधिकारात माहिती मागितल्याच्या रागातून सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याला बेदम मारहाण

**भिवंडी/अभिजित हिरे**



ग्रामपंचायत कार्यालयात माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत माहिती मागितल्याचा राग आल्याने तिघांनी सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षकाला बेदम मारहाण केल्याची घटना शुक्रवारी भिवंडी तालुक्यातील कांबे या गावात घडली आहे. याप्रकरणी निजामपुरा पोलीस ठाण्यात तिघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुभाष सिताराम रापटे वय ६७ वर्ष रा.कांबेगाव असे मारहाण झालेल्या सेवानिवृत्त सहाय्य पोलीस निरीक्षकाचे नाव आहे.सुभाष रापटे यांनी कांबे ग्रामपंचायत क्षेत्रातील प्रधानमंत्री अवास योजनेतील लाभार्थ्यांची यादी माहिती अधिकारात घेतली असता त्यामध्ये ग्रामपंचायत लिपिक वैभव पालकर याने आपले दोन काका व एक आत्या अशा तिघांना त्यांच्या मालकीची पक्की बांधकाम असलेली घरे असताना लाभ मिळवून दिला असल्या बाबत तक्रार केली होती. ही माहिती सुभाष रापटे ग्रामपंचायत कार्यालयातुन घेवून निघाले असता कार्यालया बाहेर ग्रामपंचायत लिपिक वैभव सुरेश पालकर, त्याचे आईवडील सुरेश बाळकृष्ण पालकर व लता सुरेश पालकर यांनी सुभाष रापटे यांच्या वर लोखंडी रॉड व पावरलूम च्या लाकडी दांड्याने हल्ला करीत बेदम मारहाण केली आहे.या मारहाणीत सुभाष रापटे रक्तबंबाळ होऊन गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.तर निजामपुरा पोलिसांनी जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी तिघां विरोधात गुन्हा दाखल करीत आरोपी वैभव पालकर यास अटक केली आहे.तर आईवडील सुरेश पालकर व लता सुरेश पालकर हे फरार असून या गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक दीपक शेलार हे करीत आहेत.

# देवणी खुर्दच्या डॉ.अनुजा पाटे यांची वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती!

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तालुक्यातील देवणी खुर्द या गावची मुलगी डॉ. आनुजा गोविंद पाटे चांगले शिक्षण घेऊन वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर होण्याचा मान मिळावला आहे. त्यांचे वडील गोविंद पाटे हे शेती करून मुलांना चांगले शिक्षण व संस्कार दिल्या मुळे एक ग्रामीण भागातील मुलगी उच्च शिक्षण घेऊन डॉक्टर होण्याचा आत्मविश्वास निर्माण करुन देवणी खुर्दचे नाव हे वैद्यकीय क्षेत्रात नावलौकीक केल्यामुळे गावातील सरपंच यशवंत कांबळे, उपसरपंच विठ्ठल शिंगडे, चेअरमन रतन गरड, पोलीस पाटील तुकाराम देवणीकर, मनोहर पाटील, रमेश कांबळे, सुभाष पाटील, अनिल कांबळे, माधव पाटे, माधव रणदिवे, पत्रकार लक्ष्मण रणदिवे, मुलतानी पठाण, राजाराम पाटील, ज्योतिबा पाटील, यादुल पठाण, आदिनी अभिनंदन केले आहे.

# जलयुक्त शिवारला मोठे यश, जलसंवर्धनात महाराष्ट्र पहिला

**मुंबई/प्रतिनिधी**

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने भारतातील जलाशयांच्या गणनेचा पहिला अहवाल जाहीर केला असून, त्यात महाराष्ट्राचा देशात पहिला क्रमांक आला आहे. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेचे अभिनंदन केले आहे. या अहवालाबाबत माहिती देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने भारतातील जलाशयांच्या गणनेचा पहिला अहवाल जाहीर केला असून, त्यात आपल्या महाराष्ट्राचा देशात पहिला क्रमांक आला आहे, हे सांगताना मला अत्यानंद होतो. जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे आदी योजना एकत्रितपणे राबविल्याचे हे यश आहे. अन्य राज्यात तळी आणि जलसाठे अधिक असली तरी जलसंवर्धनाच्या बाबतीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आला आहे. २०१८-१९ या वर्षात ही गणना करण्यात आली होती. या अहवालातील महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे बहुसंख्य जलसाठे हे जलसंवर्धन योजनांमधील आहेत. जलयुक्त शिवार आणि अन्य जलसंवर्धनाच्या योजनांना लोकचळवळ बनविणाऱ्या महाराष्ट्रातील सर्व नागरिकांचे, सामाजिक संघटनांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मन:पूर्वक अभिनंदन केले असून, या कार्यात सहभागी सर्वांचे आभार सुद्धा मानले आहेत. हे आपल्या सर्वांचे सामूहिक यश आहे. आता जलयुक्त शिवार २.० अभियान सुद्धा असेच सर्वांनी यशस्वी करावे, असे आवाहन सुद्धा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

# आंतरजिल्हा घरफोड्या करणाऱ्यांना स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

**सोलापूर/ईरप्पा बोरीकरजगी**



अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या भानुबाई ख्यामगोंडे यांच्या घरी घरपोडी झाली होती त्या गुन्ह्याचा तपास करताना सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांनी आपल्या सहकारी पोलीस अधिकारी यांना दिलेल्या सूचनेनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे व त्यांच्या पथकाने आंतरजिल्हा अट्टल घरफोड्या करणाऱ्या अनिल श्रीमंत पवार याला अटक केली त्याच्याकडून ५ लाख ३४ हजाराचे सोन्या चांदीचे दागिने व रोकड जप्त केली आहे. १३ घरफोड्या व एक मोटरसायकल चोरी असे १४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. सुलेरजवळगे येथील मड्डीवस्तीमध्ये राहणाऱ्या भानुबाई अमोगसिद्ध ख्यामगोंडे यांचे बंद घर चोरट्याने २० ऑगस्ट २०२२ रोजी फोडले होते. सोन्या चांदीचे दागिने व रोकड लांबवली होती, याबरोबरच चोट्याने त्या परिसरातील आणखी पाच घरे फोडली होती. एक लाख ६७ हजाराचा ऐवज लांबविला होता. अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी सोलापूर ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेला या घरफोड्या उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांनी आपल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सूचना दिल्या होत्या. या गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे हे करत होते. धनंजय पोरे व त्यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला होता. पोलिसांना खबऱ्यांकडून माहिती मिळाली की ही घरफोडी पानमंगरूळ येथील आरोपीने त्यांच्या साथीदारांसह केली आहे. पोलिसांनी अनिल श्रीमंत पवार राहणार पानमंगरूळ तालुका अक्कलकोट याला पानमंगरुळ येथून अटक केली. त्याचा साथीदार प्रीती उर्फ घुल्या झिझिंग्या पवार हा फरारी आहे.

ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे, फौजदार राजेश गायकवाड, सहाय्यक फौजदार बिराजी पारेकर, श्रीकांत गायकवाड, हवालदार सलीम बागवान, आबासाहेब मुंडे, हरिदास पांढरे, विजयकुमार भरले, पोलीस नाईक रवी माने, पोलीस कॉन्स्टेबल गाजरे, घोरपडे, सुनंदा झळके, दिलीप थोरात व सायबर कडील कर्मचाऱ्यांनी पार पाडली आहे.

# देवणीत सेवानिवृत्तीबद्दल निर्मलाताई पाटील यांचा सत्कार




**देवणी/प्रतिनीधी**

देवणी येथील जिल्हा परिषद प्रशालेतील पदवीधर शिक्षिका श्रीमती निर्मलाताई कल्याणराव पाटील-जिवणे यांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती बद्दल बुधवार रोजी प्रशालेच्या वतीने सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला. या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवणी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा डॉ. कीर्तीताई संजय घोरपडे हे होते तर प्रमुख पाहुणे उपनगराध्यक्ष अमित मानकरी, पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे, नगरसेवक नागेश जीवणे, जमीर तांबोळी पोलीस उपनिरीक्षक मुजाहेद शेख, गटशिक्षणाधिकारी व्यंकटराव बोईनवाड, भाजपाचे युवा नेते अमर पाटील, सेवानिवृत्त आदर्श शिक्षक सुभाष बिराजदार, शालेय समितीचे अध्यक्ष सलीम मणियार, प्रा.रेवण मळभगे, पूजा लिंगराज बिराजदार, सहशिक्षिका शांता लोहारे, गुंडाप्पा जीवणे, सेवानिवृत्त प्रा. बाबुराव जिवणे, मुजीब शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागत गीताने सर्वांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्याच्या सत्कार करण्यात आले.यानंतर जिल्हा परिषद प्रशाला देवणीच्या वतीने निर्मलाताई कल्याणराव पाटील- जिवणे यांचे सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास केंद्रप्रमुख, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जि.प. प्रशालेचे मुख्याध्यापक जी.बी. सूर्यवंशी यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार ए.एम. चौधरी यांनी केले. हे कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सहशिक्षक एस.एन. बुरले, व्ही.टी. तायडे, आर.बी. मेहत्रे, आर.जी. जळकोटे, एस. व्ही.चिद्रेवार, बी.डी.मगर, एस.आर. स्वामी, एन. डब्ल्यू. सय्यदा, एम.एस. सुरवसे, जी.पी. पाटील, जी.एस. जाधव, जी.एस. परीट आदीसह विद्यार्थी परिश्रम घेतले.

## लातूर व उस्मानाबाद जिल्ह्याचे प्रशिक्षण!

लातूर : लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्याचे नियोजित दुसरे घटना प्रतिसाद प्रणाली आयआरएस प्रशिक्षण कार्यक्रम पार पडले या प्रशिक्षणात उस्मानाबाद जिल्ह्यातील ११ कर्मचारी आणि लातूर जिल्ह्यातील १६ असे एकूण २७ जण उपस्थित होते. जिल्ह्यात घडणाऱ्या घटनाची माहिती, पूर्वसूचना, आपत्ती प्रतिसादासाठी आवश्यक संसाधने, अति महत्वाचे दूरध्वनी क्रमांक, घटना घडल्यानंतर त्याच्या नोंदी त्याचबरोबर विविध प्रकारचे कुशल व अकुशल ह्युमन रिसोर्स इत्यादी ची माहिती या प्रणाली द्वारे उपलब्ध होणार आहे. या प्रणालीचा वापर तालुकास्तरावर तसेच जिल्हास्तरावरील विविध विभागाच्या माध्यमातून होणार असून या प्रणालीला वेगवेगळ्या पोर्टलची संलग्नित केले जाणार आहे. सदरील प्रशिक्षण तालुकास्तरावरील नैसर्गिक तहसील कार्यालयातील नैसर्गिक आपत्तीचे कामकाज करणारे कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता.

# थोडक्यात वृत्तांत

## पार्किंगमध्ये बांधलेल्या दुकानांना ठोकले सील

लातूर : अपार्टमेंट मध्ये पार्किंगसाठी सोडलेल्या जागेत अनधिकृतपणे बांधलेल्या दुकानांना मनपाच्या पथकाने सील ठोकले. मनपा आयुक्तांच्या सूचना व नगर रचनाकारांच्या आदेशावरून ही कारवाई करण्यात आली. अपार्टमेंटमधील नागरिकांना पार्किंगसाठी जागा सोडण्यात आलेली असते परंतु नितीन केशवलाल शहा यांनी या जागेचा अनधिकृतपणे व्यावसायिक वापर केल्याचे निदर्शनास आले.शहा यांनी पार्किंगच्या जागेत तीन दुकाने बांधलेली दिसून आली. नियमांचा भंग झाल्यामुळे या दुकानांना सील ठोकण्यात आले. या कारवाईत मनपाचे क्षेत्रीय अधिकारी बंडू किसवे, कर निरीक्षक शेख तहेमीद, स्वच्छता निरीक्षक शेख आक्रम, देवेंद्र कांबळे, कनिष्ठ अभियंता सौ.नौशाद शेख, गफार इनामदार, भालचंद्र कांबळे, संतोष ठाकूर, अशोक पवार, रहीम शेख, दत्ता गंगथडे,महादेव बेलकुंदे, किशोर भालेराव, महादू पवार, समीर शेख, महेबूब शेख, जावेद शेख, दत्ता कदम, मुस्तफा शेख, मैनोद्दीन शेख यांनी सहभाग घेतला.

## बाळासाहेब जाधव यांचा सत्कार

लातूर : पत्रकारिता आणि पत्रकारांसाठी काम करणार्या व्हाईस ऑफ मिडीया या संघटनेची मराठवाडा कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून यामध्ये व्हाईस ऑफ मिडीयाच्या मराठवाडा कार्यवाहकपदी बाळासाहेब जाधव यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल जे.एस.पी.एम.चे समन्वयक संचालक निळकंठराव पवार यांच्याहस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जेएसपीएमचे शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील, प्रविण जोशी, संकेत गवळी, गोपाळ खोंडे यांची उपस्थिती होती. मरा ठवाड्यातील आठ जिल्हे, ४८ तालुक्यातून २६,५०० पेक्षा जास्त पत्रकार सदस्यांनी व्हाईस ऑफ मिडीया या संघटनेशी आपले नाते जोडलेले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात सभासद संख्य असणारी व्हाईस ऑफ मिडीया ही मराठवाड्यातील एकमेव संघटना झाली आहे.

## युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ!

लातूर : जिल्ह्यात कार्यरत असलेल्या युवक-युवती व नोंदणीकृत संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा आणि युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने जिल्ह्यातील युवक, युवती तसेच नोंदणीकृत संस्थाना जिल्हा युवा पुरस्कार दिला जातो.सन २०१९-२०,२०२०-२१,२०२१-२२,२०२२-२३ या चार वर्षाच्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी यापूर्वीच अर्ज मागविण्यात आले होते. या पुरस्कारासाठी केवळ एक अर्ज प्राप्त झाल्यामुळे अर्ज सादर करण्यास १५ मे २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. अर्जाचा विहीत नमुना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे, (मो.नं.९९७५५७६६००) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.

## जिल्हा कोषागार अधिकाऱ्यांची बदली!

लातूर : जिल्हा कोषागार कार्यालय,लातूर येथील जिल्हा कोषागार अधिकारी राधाकिसन राऊत यांची जालना येथे स्थानिक निधी सेवा परिक्षण कार्यालयात सहायक संचालक पदावर येथे बदली झाली आहे. बदलीच्या पदावर रुजू होण्यासाठी २७ एप्रिल २०२३ रोजी कोषागार कार्यालयात त्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी अप्पर कोषागार अधिकारी एन.ई. बुध्दीवंत, उपकोषागार अधिकारी आर.के. कलवले यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अप्पर कोषागार अधिकारी के.एन. खोजे, वा.अ. सय्यद, बी.टी. शिखरे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी यांनी प्रयत्न केले.याप्रसंगी लातूर जिल्हा कोषागार अधिकारी, पदाचा कार्यभार अप्पर कोषागार अधिकारी संतोष धुमाळे यांचेकडे सुपूर्द करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ लेखापाल जी.एन. गोपवाड यांनी केले.

## मयताच्या नातेवाईकांचा पोलिसांकडून शोध!



वसई : माणिकपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला. याची माहिती स्थानिक लोकांनी दिली. हा व्यक्ती वसई गाव ते वसई स्टेशन रोड जाणाऱ्या रस्त्याच्या फुटपातीवर अशक्तपणा असल्याने त्याचा नवघर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपाचारार्थ दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले. मयत व्यक्तीचे वय अंदाजे २५ ते ३० वर्ष. थोडक्यात वर्णन असा आहे की अंगात राखाडी रंगाचा शर्ट, निळ्या रंगाचा बरमोडा, दाढी वाढलेली, उभट चेहरा असलेला व्यक्ती मयत असून अशा वर्णाचे अनोळखी इसमाच्या नातेवाईकाचा शोध होण्या कामी पोलीस तपास करीत आहेत. याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक एम.के.वडणे करीत आहेत. सदर फोटोतला व्यक्तीबद्दल कोणास काही माहिती मिळाली असल्यास माणिकपूर पोलीस ठाण्यात संपर्क साधावा.

## मार्जिन मनी योजनाविषयक कार्यशाळा!

लातूर : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून सामाजिक न्याय पर्व अभियानांतर्गत विविध कल्याणकारी योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यात येत आहे. या अंतर्गत २७ एप्रिल रोजी रेणापूर तालुक्यातील हारवाडी येथे अनुसूचित जातीच्या नवउद्योजकांना मार्जिन मनी योजनेची माहिती देण्यासाठी आयोजित कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यशाळेला समाज कल्याण कार्यालयातील समाज कल्याण निरीक्षक भगवान केंद्रे, बार्टीचे प्रकल्प संचालक श्री. धनासुरे, समतादूत बलभीम सुरवसे तसेच हारवाडीचे ग्रामपंचायत सदस्य, माजी सरपंच व गावातील नागरिक उपस्थित होते. समाज कल्याण निरीक्षक भगवान केंद्रे यांनी समाज कल्याण अंतर्गत येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. अनुसूचित जातीच्या तरुणांना उद्योगासाठी प्रवृत्त करण्यासाठी स्टँडअप योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येणाऱ्या मार्जिन मनी या योजनेची सखोल माहिती देवून अनुसूचित जातीच्या तरुणांनी उद्योगाकडे वळण्याकरीता आवाहन केले. करण इंगळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यशाळेचे प्रास्ताविक बलभीम सुरवे यांनी केले.

01 TO 07 MAY 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 4/29/2023 9:50 PM Page 1



# खरे महाराष्ट्र भूषण आजही दारिद्र्यात!

शिछत्रपतींच्या महाराष्ट्राला फार मोठा वैभवशाली इतिहास आणि परंपरा आहे आणि तो इतिहास व परंपरा जतन करण्याची तसेच येणाऱ्या प्रत्येक पिढीला त्या इतिहासाची माहिती देण्याची जबाबदारी इथल्या शासन कर्त्यांची आहे. पण इतिहासातील घटनांकडे केवळ एक इव्हेंट म्हणून बघण्याची आणि त्या घटनेचे महत्व त्या दिवसा पुरतेच मर्यादित ठेवण्याची पद्धत आता हळूहळू वृढ होत चालली आहे. त्यामुळे भावी पिढीला इतिहासातून फारशी माहिती मिळत नाही आणि माहिती मिळत नसल्याने ऐतिहासिक घटनांचे महत्व समजून घेण्याची त्यांना आवश्यकताही वाटत नाही. मग ते सण वार असोत, कि स्वातंत्र्य संग्राम असो. आजच्या पिढीला त्याची फारशी माहिती नाही. संयुक्त महाराष्ट्राचा इतिहासही आजच्या पिढीला ठावूक नाही. त्यामुळे १ मे या महाराष्ट्र दिनाकडे ते केवळ एक इव्हेंट बनून बघतात १ मेचा महाराष्ट्र दीन साजरा केल्यावर २ मेला सार काही विसरून जातात. कारण १ मे १९६० साली महाराष्ट्र हे नवे राज्य अस्तित्वात आले. इथल्या मराठी माणसाला मुंबईसह महाराष्ट्र मिळाला. पण तो मिळवण्यासाठी ज्या १०५ हुतात्म्यांनी रक्त सांडले, ज्या लोकशाहीर मंडळींनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ घराघरात पोहचवून लोकांना जागे केले त्या शाहिरांची आज काय अवस्था आहे याची सरकारला कल्पना आहे का? शाहीर साबळे, शाहीर अमर शेख, शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर आत्माराम पाटील यांनी डफावर थाप दिली नसती आणि महाराष्ट्र द्वेष्टी लोकांचे कपडे फाडले नसते, तर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला तलवारीची धार आली नसती. आणि मराठी माणसाला मुंबईसह महाराष्ट्र कधीच मिळाला नसता. स्वतंत्र महाराष्ट्रासाठी जितके सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, आचार्य अत्रे, एस.एम.जोशी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कॉ.डांगे यासारख्या महापुरुषांचे योगदान आहे, तितकेच योगदान महाराष्ट्राच्या लोक कलेतील कलावंतांचे आहे. मग ते तमासगीर असोत, कीर्तनकार असोत, की शाहीर असोत या सर्वांनी हातात हात घालून संयुक्त महाराष्ट्रासाठी रक्त सांडले. पण या लोकांचे कुठेच नाव नाही. त्यांचे हयात वारसदार आज काय करतायत? कसे जगतयत याची सरकारला पडलेली नाही. शाहीर आत्माराम पाटील, शाहीर जंगम, शाहीर डांगे, शाहीर जैनु शेख ही सगळी मंडळी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा एक भाग होती, पण आज त्यांचे वारसदार दुर्लक्षित आहेत. शाहीर अण्णाभाऊ साठे आणि शाहीर अमर शेख यांना खरे तर मरणोत्तर महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळायला हवा होता. पण त्यांचे नातेवाईक पैसेवाले नाहीत, त्यांच्या मागे हजारो अंधभक्त नाहीत. आणि मुख्य म्हणजे ते उच्च वर्णिय नाहीत. मग त्यांनी सांडलेल्या रक्ताला काय किंमत असेल. संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा देशाच्या स्वातंत्र्य लढ्या इतकाच मोठा होता. कारण देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जी भाषावार प्रांत रचना झाली त्यात फाजल कमिशनने मराठी भाषिकांवर अन्याय केला. निजामाच्या हैद्राबादला एक भाषिक दर्जा मिळाला, पण मराठी मूलकाला द्विभाषिक! शिवाय कारवार, बेळगाव, निपाणी, बिदर हा मराठी मुलुख महाराष्ट्रापासून तोडण्यात आला. मुंबई महाराष्ट्राची आणि मराठी माणसाची असूनही त्यावेळचे सत्ताधारी काँग्रेसवाले नेहरू तसेच महाराष्ट्रातले मोरारजी आणि सका पाटलांसारखे त्यांचे दलाल मुंबई महाराष्ट्राला मिळू नये यासाठी देव पाण्यात बुडवून बसले होते. मोरारजी म्हणत होता जोवर काँग्रेस आहे तोवर मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही, तर सका पाटील म्हणत होता की चंद्र सूर्य गगनात असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही, पण या दोघांच्याही उरावर पाय रोवून तसेच त्यांच्या गोळ्या छातीवर झेलून १०५ हुतात्म्यांचे बलिदान देऊन मराठी माणसाने मुंबई सह महाराष्ट्र मिळवला आणि या इतिहासात शाहीरांचे योगदान मोलाचे आहे ते खरे महाराष्ट्र भूषण आहेत. पण सरकारला त्यांचाच विसर पडला. पण सरकारमध्ये बसलेले जरी नमक हराम निघाले तरी महाराष्ट्रातली जनता शाहिरांना विसरणार नाही. १ मे हा जसा महाराष्ट्र दीन आहे, तसाच कामगार दीन सुद्धा आहे. पण आज महाराष्ट्रातल्या कामगारांची शेतमजुरांची शहरातल्या कष्टकऱ्यांची वाईट अवस्था आहे. सरकारी सेवांमध्ये जेमतेम ४ तास काम करून लाखो रुपये तिथल्या कर्मचाऱ्यांना मिळतात. पण जे माथाडी कामगार आहेत, जे स्टेशनवर हमाली करतात, जे कारखान्यांमध्ये १२-१२ तास ड्युटी करतात त्यांना महिन्याला १० ते १२ हजार सुद्धा मिळत नाहीत. सध्याच्या महागाईच्या काळात अशा लोकांनी कसे जगायचे. महाराष्ट्रातील असंघटित कामगारांचे जीवन भयंकर खडतर बनले आहेत. इथल्या राज्यकर्त्यांनी गिरणी कामगारांचा संप मोडून कढला आणि गिरण्यांच्या जागा बिल्डरांच्या घशात घालून मुंबईची खरी ओळख असलेल्या इथल्या गिरणी कामगाराला उध्वस्त करून मुंबई बाहेर घालवले आज तेच लोक १ मे हा महाराष्ट्र आणि कामगार दीन म्हणून साजरा करायला पुढे असतील. हा प्रकार म्हणजे आई सोबत दुष्कर्म करून बापाला सलाम करण्यासारखा आहे. त्यामुळे अशा लोकांच्या सावलीलाही कुणी उभे राहू नये हीच खरी संयुक्त महाराष्ट्रासाठी हुतात्मा झालेल्यांना श्रद्धांजली ठरेल!

### मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० लोकार्पण कार्यक्रम

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी उपयुक्त-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना दिवसाही वीज उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अतिशय उपयुक्त ठरणार असून शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठीची ही 'फ्लॅगशीप' योजना सर्व जिल्ह्यांमध्ये अतिशय प्रभावीपणे राबविण्यात यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. नुकत्याच झालेल्या सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्या एक दिवसीय परिषदेत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० च्या लोकार्पणाचा कार्यक्रम झाला. यावेळी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करिर, अपर मुख्य सचिव दीपक कपूर, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, प्रधान सचिव एकनाथ डवले, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे, विजय सिंगल, पी.अन्बलगन, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, तसेच विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी उपस्थित होते. यावेळी 'मिशन-२०२५' या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शेती आणि शेतकरी राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी भक्कमपणे कायम उभे आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, कारण ही स्वस्त आणि हरित ऊर्जा आहे. क्रॉस सबसिडी कमी होण्याच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रालाही ही योजना चालना देणारी ठरेल. या योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त फीडर हे सौर ऊर्जेवर आणण्यावर भर देण्यात येणार आहे. सौर ऊर्जेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणारा जिल्हा करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रयत्नशील रहावे. या प्रकल्पांमध्ये जमिनीची उपलब्धता कालबद्ध होणे हे अत्यंत गरजेचे असल्याने यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी महावितरण सब स्टेशनच्या पाच ते दहा किलोमीटरमध्ये असणाऱ्या शासकीय व निमशासकीय जमिनींची माहिती गोळा करावी. त्यातील ज्या जमिनी प्रकल्प उभारण्यासाठी सुयोग्य असतील त्या जमिनी आवश्यक ती सगळी प्रक्रिया करून या सर्व प्रकल्पांसाठी उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देशही उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले.

**ग्रामपंचायती अंतर्गत विविध सुविधाही सौर ऊर्जेवर**

पुढील टप्प्यात ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या विविध सुविधा, कार्यालये पूर्णपणे सौर ऊर्जेवर करण्यावर भर देण्यात येणार आहे. सौर ऊर्जा विकासाच्या क्षेत्रात मोठे उद्योग येण्यास उत्सुक आहेत. बॅटरीवरील पंपही भविष्यात मोठे बदल घडवून आणणारे ठरतील. सर्व जिल्हाधिकारी यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० योजनेचा संबंधित जिल्ह्यांत अधिकाधिक प्रचार-प्रसार करावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले. ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला प्रास्ताविकात म्हणाल्या की, वीज क्षेत्रात गेल्या दशकात मोठे बदल झाले आहेत. २०१७ मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना नावाने भविष्याचा वेध घेणारी महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आली. याद्वारे किफायतशीर सौर ऊर्जेचा फायदा औद्योगिक ग्राहकांसह शेतकऱ्यांनाही कसा करून देता येईल, याचा विचार करण्यात आला. सुरुवातीच्या काळातील या योजनेच्या अंमलबजावणीचे उत्साहवर्धक परिणाम दिसून आले आहेत. या योजनेद्वारे शेतकऱ्यांना दिवसा पुरवठा उपलब्ध होणार असून त्यामुळे शेतकऱ्यांचा सिंचनाच्या वेळी होणारा त्रासही कमी होणार असल्याचे श्रीमती शुक्ला यांनी सांगितले.

**मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना- २.० - 'मिशन २०२५'**

देशाने अपारंपारिक ऊर्जेच्या वापरासाठी ४५० गिगाव्हॅट क्षमता २०३० पर्यत उभारण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्या दृष्टीने देखील मिशन २०२५ ची अंमलबजावणी महत्त्वाची ठरेल. याद्वारे फक्त शेतीसाठी आणि एका राज्यात ७ हजार मेगावॅट पेक्षा जास्त सौर ऊर्जा निर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. इतर अनेक क्षेत्राप्रमाणे शेती क्षेत्रही विजेच्या मागणीत देशभरात अग्रेसर असून महाराष्ट्रातील सुमारे ४५ लाख शेती वीज पंपांची संख्या ही देशात सर्वाधिक आहे. राज्यातील एकूण विजेच्या वापरापैकी २२ टक्के वीज वापर शेतीसाठी होतो. शेतीला परवडणाऱ्या दरात वीज मिळावी यासाठी शासनाकडून दरवर्षी मोठ्या प्रमाणात अनुदान तर दिले जातेच पण वीज वितरण कंपनीच्या इतर ग्राहकांकडून क्रॉस सबसिडी देखील दिली जाते. शेतकऱ्यांना माफक, सवलतीच्या दरात वीज पुरवठा केला जातो. भविष्यामध्ये क्रॉस सबसिडीच्या माध्यमातून शेतीचे वीजदर मर्यादित ठेवण्यावर मोठ्या प्रमाणात मर्यादा येणार आहे. त्यादृष्टीने वीज ग्राहक, शेतकरी व वीज वितरण कंपनी या सर्वांच्या हिताची अशी ही योजना आहे. शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना दिवसा अखंडीत व भरवशाचा वीज पुरवठा करण्यासाठी हे अभियान आहे.

**डिसेंबर २०२५ पर्यत ३० टक्के शेतीच्या वाहिन्या सौर ऊर्जेवर**

मिशन २०२५ च्या माध्यमातून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अजून महत्त्वाकांक्षीपणे मोठ्या प्रमाणात व वेगाने अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मिशन २०२५ द्वारे डिसेंबर २०२५ पर्यत सर्व जिल्ह्यातील किमान ३० टक्के शेतीच्या वाहिन्या अशा प्रकल्पांद्वारे सौर ऊर्जेवर आणण्याचे उद्दिष्ट असून मिशन २०२५' द्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी अनेकविध प्रोत्साहनात्मक सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यात शेतकरी व सौर उद्योग या दोघांसाठीही फायद्याच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. शेतकरी या प्रकल्पांसाठी जमीन भाड्याने द्यायला तयार आहेत. त्यांना दर हेक्टरी एक लाख २५ हजार रुपये दरवर्षी एवढा भाडेपट्टा देण्याची तरतूद आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना खात्रीच्या उत्पन्नाचा एक मार्ग उपलब्ध होऊ शकेल. ज्या ठिकाणी शासकीय जमिनी महावितरणच्या सब स्टेशनच्या जवळ उपलब्ध आहेत, तिथे या जमिनी सुद्धा सर्व प्रकल्पांसाठी उपलब्ध करून देण्यात येतील. त्यामुळे असे प्रकल्प मोठ्या प्रमाणात राबवणे शक्य होईल.

**सौर ऊर्जेच्या संदर्भातली इकोसिस्टीम तयार होणार**

शेतकऱ्यांच्या बरोबरच उद्योजकांनीही या प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन वेगाने शेतकरी हिताचे प्रकल्प उभारावेत यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. त्याचबरोबर ज्या गावांमध्ये हे प्रकल्प उभे राहतात अशा ग्रामपंचायतींना देखील पहिली तीन वर्षे पाच लाख रुपये प्रति वर्ष असे अनुदान दिले जाईल. या सर्व उपाययोजनांमुळे ग्रामीण भागामध्ये संपूर्ण सौर ऊर्जेच्या संदर्भातली इकोसिस्टीम तयार होईल. ग्रामीण युवकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी तयार होतील. त्यांच्यामध्ये सौर ऊर्जा संदर्भातील आवश्यक कौशल्यांचा विकास होईल.

**अर्थव्यवस्थेला व शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारे मिशन**

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक या अभियानांतर्गत अपेक्षित आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेला व शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारे हे मिशन २०२५ महत्त्वाकांक्षी योजना आहे. मिशन २०२५ची अंमलबजावणी फक्त महाराष्ट्रासाठीच नाही तर सर्व देशासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. मिशन २०२५ अंतर्गत देण्यात येणारे प्रोत्साहनात्मक अनुदान, जमिनीची उपलब्धता वाढवण्यासाठी करण्यात येणारी प्रक्रिया अशा अनेक उपाययोजना राष्ट्रीय स्तरावर देखील कुसुम योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक ठरतील. त्या दृष्टीने देखील महाराष्ट्र मिशन २०२५ची यशस्वी अंमलबजावणी करणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### 'एनसीआय' मध्यभारतातील कॅन्सरच्या उपचाराचे आरोग्य मंदिर -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरसंघचालक डॉ.मोहन भागवतांच्या उपस्थितीत एनसीआयचे लोकार्पण



**नागपूर/प्रतिनिधी**

नागपूर येथे उभ्या राहिलेल्या नॅशनल कॅन्सर इंस्टिट्यूटमुळे (एनसीआय) कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठा दिलासा मिळाला आहे. ही संस्था विदर्भासह मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा या मध्य भारतातील राज्यांसाठी आरोग्य मंदिर ठरत आहे. राज्यातही उत्तम आरोग्य यंत्रणा उभारण्यासाठी शासन कटीबद्ध आहे असे प्रतिपादन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले. समृद्धी महामार्गाच्या झिरो माईल शेजारी जामठा परिसरात स्थित राष्ट्रीय कर्करोग संस्थेचे (नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट) सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांच्या हस्ते आज लोकार्पण झाले. या सोहळ्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार चंद्रशेखर बावनकुळे, नॅशनल कॅंसर इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष ॲड. सुनील मनोहर, माजी खासदार तथा उपाध्यक्ष अजय संचेती, मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जोगळेकर आदी मंचावर उपस्थित होते. तर या सेवाभावी कार्यक्रमाला विधासभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उद्योग व वाणिज्य क्षेत्रातील दिग्गज सर्वश्री गौतम अडाणी, दिलीप सिंघवी, समीर मेहता, पार्थ जिंदाल आणि जयप्रकाश रेड्डी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, (एनसीआय) या संस्थेला सेवाव्रती कार्यासाठी सर्वप्रथम मनापासून शुभेच्छा देतो. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व मेहनतीतून ही संस्था निर्माण झाल्याचे सांगत त्यांनी फडणवीस यांचे अभिनंदन केले. राज्यासमोर आरोग्य सेवा हे मोठे आव्हान आहे. नुकताच कोरोना संकटाचा अनुभव आपण घेतला असून हवामान बदल, उष्माघात या प्रमाणेच कॅन्सर ही मोठी समस्या म्हणून पुढे येत आहे. देवेंद्र फडणवीस यांचे वडील, त्यांचे सहकारी शैलेश जोगळेकरांच्या पत्नी आणि माझ्या आईचा मृत्यू कॅन्सरनेच झाल्याचा उल्लेख करुन या वेदनादायी आठवणी मागे ठेवत सार्वजनिक हितासाठी लोकप्रतिनिधींनी असे दृष्य कार्य करायचे असते आणि हाच मार्ग आम्ही अवलंबल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री असतांना देवेंद्र फडणवीस यांनी विदर्भासाठी वरदान ठरणाऱ्या हिंदूह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाची संकल्पना मांडली व हा प्रकल्प पूर्णत्वास घेवून जाण्यासाठी मेहनत घेतली. या घटनेचा साक्षीदार असल्याचे त्यांनी सांगितले. एनसीआयची नागपुरात उभारणी करण्याची संकल्पना मांडून तीही उपमुख्यमंत्र्यांनी पूर्णत्वास नेली. घेतलेले काम पूर्णत्वास नेण्याची त्यांची खुबी आहे. ही संस्था उभी राहणे मोठी उपलब्धी व ऐतिहासिक कामगिरी आहे. सर्व सामान्य रुग्णांना यामुळे मोठा दिलासा मिळेल. ही संस्था विदर्भासह महाराष्ट्र व मध्यभारतातील कॅन्सर उपचारासाठी आरोग्य मंदिर ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या संस्थेला लोकप्रतिनिधींनी भेट देऊन या कार्यातून प्रेरणा घ्यावी व आपापल्या भागात अशी सेवाव्रती आरोग्य मंदिरे उभारावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली. अशा संस्थांच्या पाठीशी राज्य शासन भक्कमपणे उभे राहिल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. राज्य सरकार सर्व सामान्य जनतेला उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून देत आहे. मुख्यमंत्री सहायता कक्ष', महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना' आणि मुख्यमंत्री सहायता निधी' मधून भरघोस मदत करण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

कॅन्सरवरील उपचारासाठी आता विदर्भातील रुग्णांना मुंबई व अन्य ठिकाणी न जाता एनसीआयमध्ये नागपुरातच अत्याधुनिक उपचार घेता येणार आहेत. ही संस्था उत्तम उपचार आणि संशोधनामुळे देशाला कॅन्सरमुक्त करण्यास उपयुक्त ठरेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला. अमेरिकेत कॅंसरच्या रुग्णांमध्ये ३३ टक्क्यांनी घट झाली आहे. मात्र, भारतात कॅन्सर रुग्णांची संख्या वाढत आहे. एनसीआय सारख्या संस्था देशात उभ्या राहिल्यास कॅन्सर रुग्णांची संख्या कमी होईल व देश या आजारापासून मुक्त होण्यास उपयुक्त ठरतील, असेही ते म्हणाले.

**कॅन्सरवरील अत्याधुनिक उपचार पद्धती व संशोधन केंद्र उभारणार - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विदर्भातील कॅन्सर रुग्णांना मुंबईसह देशाच्या अन्य भागात उपचारासाठी जावे लागत असे. यावर कायम तोडगा काढण्यासाठी ३० वर्षापासून पाहिलेले स्वप्न एनसीआयच्या माध्यमातून पूर्ण झाल्याचा आनंद आहे. या संस्थेच्या माध्यमातून विदर्भ, महाराष्ट्रासह मध्य भारतातील कर्करोगाच्या रुग्णांना स्वस्तात उत्तम उपचार उपलब्ध होणार आहेत. हे कार्य पुढे घेऊन जात रुग्णांच्या नातेवाईकांच्या नि:शुल्क निवासासाठी येथे धर्मशाळा उभारण्यात येणार आहे. पूर्व विदर्भात थॅलेसेमिया आणि सिकलसेल आजाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणात असून या आजारावर संशोधन व उपचार करण्यासाठी येत्या काळात एनसीआयमध्ये संशोधन केंद्र उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**एनसीआय हा कॅन्सर उपचारासाठी एक उत्तम संस्था - सरसंघचालक डॉ मोहन भागवत**

कॅन्सर हा दुर्धर आजार असून कॅन्सरग्रस्तांना आपलेपण व हिंमतीची गरज असते. नागपुरात उभी राहिलेली एनसीआय ही संस्था कॅन्सरग्रस्तांना हिंमत देणारी व त्यांच्या उपचारासाठी एक उत्तम संस्था ठरली आहे, असे प्रतिपादन सरसंघचालक डॉ मोहन भागवत यांनी केले. डॉ आबाजी थत्ते यांच्या नावाशी व लोकोत्तर कार्याशी जुडलेली ही संस्था कॅंसरग्रस्तांना मोठा दिलासा देणार आहे. सरकार एकीकडे संस्था उभारतेच मात्र आरोग्य सारख्या सार्वजनिक विषयावर देशातील सर्व जनतेने स्वतःही पुढे येणे आवश्यक आहे. आरोग्य सेवेसाठी एनसीआय प्रमाणे संस्था उभारण्यासाठी समाजातील विविध घटकांनी पुढाकार घेण्याचे आवाहनही डॉ. भागवत यांनी केले.

**एनसीआयमुळे सेवेच्या संकल्पास बळ मिळेल - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा संदेश**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह अपरिहार्य कारणामुळे या कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नाहीत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या लिखित संदेशाचे वाचन नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जोगळेकर यांनी केले. आपल्या संदेशात शाह म्हणाले, कॅन्सरपासून मुक्तीसाठी 'पहिले पाऊल' हे एनसीआयचे बोधवाक्य आहे. याच वाक्याची प्रचिती या संस्थेत उपचार घेणाऱ्या रुग्णांना येत असल्याचा विश्वास व्यक्त करत एनसीआयच्या प्रेरणेतून भारतदेशात सेवेच्या संकल्प कार्यास वाहिलेल्या संस्थांना बळ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डॉ आबाजी थत्ते सेवा आणि संशोधन संस्थेच्या सहयोगाने दोन दशकांपासूनचे या संस्थेच्या निर्मितीचे स्वप्न प्रत्यक्षात येत असल्याचे समाधानही त्यांनी व्यक्त केले. शैलेश जोगळेकर यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. तत्पूर्वी मान्यवरांनी एसीआयची पाहणी केली.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

01 TO 07 MAY 2023 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 4/29/2023 9:51 PM Page 1



# सदानंद महाराजांनी समाज सुधारण्यासाठी विशेष कार्य केले -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**पालघर/प्रतिनिधी**

सिद्ध बालयोगी सदानंद महाराज यांनी समाज सुधारण्यासाठी आणि वनौषधी संगोपनासाठी विशेष कार्य केले आहे. संस्थेला आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा पुरवण्याच्या बाबतीत शासनसर्वतोपरी प्रयत्न करेल. असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. श्री सदानंद महाराज तीर्थक्षेत्र तुंगारेश्वर डोंगर (वसई) येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले कोविड काळात बालयोगी सदानंद महाराज संस्थांनी या परिसरातल्या लोकांसाठी उत्तम कार्य केले आहे.

सर्वसामान्यांच्या दुःखात धावून जाणे ही परंपरा त्यांनी जोपासली आहे आणि चांगल्या गोष्टींसाठी बाबांनी आशीर्वाद दिले आहे. आमचे सरकार देखील सर्वसामान्यांचे सरकार आहे. सर्वसामान्यांच्या हितासाठी जे-जे निर्णय घेणे आवश्यक आहे. ते आम्ही आतापर्यंत घेतले आहेत. भविष्यातही सर्वसामान्यांचा विचार करूनच आवश्यक ते निर्णय घेतले जातील. बाबांचे हे कार्य निरंतर चालू राहणार अशी अपेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. मी या आश्रमामध्ये दिघे साहेबांसोबत येत होतो. ही आठवण आज मुद्दाम मला सांगावीशी वाटते. आश्रम संस्थाकडून भविष्यातही अध्यात्मिक मानवी उन्नतीसाठी आवश्यक असणारे सर्व कार्य व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करतो. असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. यावेळी बालयोगी सदानंद महाराज, खासदार राजेंद्र गावित, सर्वश्री आमदार श्रीनिवास वनगा, राजेश पाटील, शांताराम मोरे, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, वसई विरार महानगरपालिकेचे आयुक्त अनिल पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

# सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने घरफोड्या करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना ठोकल्या बेड्या; ६० लाखांचा मुद्देमाल जप्त



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिवसा घरफोड्या करणाऱ्या आंतरराज्य सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा पर्दाफाश केला. या टोळीकडून करून सुमारे १०० तोळे सोने आणि २०० तोळे चांदी तसेच एक कार असा सुमारे ६० लाखांचा माल हस्तगत करण्याची मोठी कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेने केली आहे. पवन ऊर्फ भुरा रामदास आर्य (वय ३८), मनोजकुमार ऊर्फ राहूल ठाकूरदास आर्य (वय ३२), दिपेंद्रसिंग ऊर्फ चिंटू विजयसिंग राठोर (वय ४१) व देवेंद्र ऊर्फ राज रामलाला गुर्जर (वय ३७) तसेच अनिल श्रीमंत पवार (वय ३५), प्रित्या ऊर्फ घुल्या झिझिंग्या पवार अशी अटक केलेल्या टोळीतील गुन्हेगारांची नावे आहेत. पोलिसांनी पवन आर्य, मनोजकुमार आर्य, दिपेंद्रसिंग राठोड, देवेंद्र गुर्जर यांच्याकडून ७५२ ग्रॅम सोने, १ हजार ५७९ ग्रॅम वजनाचे चांदीचे ३ ताट, रोख चार लाख रुपये व कार असा एकूण ५४ लाख ५४ हजार ६५६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या आरोपींकडून सात गुन्हे उघडकीस आले आहेत. तर दुसऱ्या गुन्ह्यात जिल्ह्यात पाच घरफोडी केल्याप्रकरणी अनिल पवार यास अटक केली. त्याच्याकडून पाच लाख ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात आरोपीने १३ घरफोडी व एक मोटारसायकल चोरी केल्याचे कबूल केले. दरम्यान, बार्शीमधील सुभाष नगरात ६ एप्रिल रोजी दिवसा आरोपींनी घर फोडून ७ लाख ८५९ हजारांचा मुद्देमाल चोरी केली होता. या गुन्ह्याच्या शोधातील पोलिसांना चोरट्यांनी मोहोळ, सांगली, कर्नाटकातील कलबुर्गी, तेलंगणातील सायराबाद येथे चोरी केल्याची माहिती मिळाली. शिवाय ही टोळी मध्यप्रदेशातील इंदौर येथील असल्याचेही समोर आले आहे . हे आरोपी धुळे जिल्ह्यातील सोनगिरी पोलीस ठाणे हद्दीत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी संशयित कार व त्यातील दोघांना ताब्यात घेऊन विचारपूस केली. त्यानंतर आरोपींनी राज्यातील विविध शहरात चोरी केल्याची कबुली पथकाला दिली. चोरीतील सोने इंदौर मधील सराफाकडे दलाला मार्फत लगड करून विकल्याची माहिती तपासात समोर दिली. पोलिसांनी चोरीचे सोने घेणारा सराफ दीपेंद्रसिंग गुर्जरला ताब्यात घेऊन सोने जप्त करण्यात आले. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर, सपोनि धनंजय पोरे, पोसई राजेश गायकवाड, ख्वाजा मुजावर, नारायण गोलेकर, प्रकाश कारटकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड, अनिस शेख, अक्षय दळवी, व्यंकटेश मोरे, अक्षय डोंगरे , समीर शेख, सहाय्यक फोजदार बिराजी पारेकर, श्रीकांत गायकवाड, सलीम बागवान, आबासाहेब मुंढे, हरिदास पांढरे, विजयकुमार भरले, पो.ना.रवि माने, समर्थ गाजरे, विनायक घोरपडे, सुनंदा झळके, दिलीप थोरात, व्यंकटेश मोरे यांनी केली आहे.

# जैन इरिगेशनचा सेंट्रल सिट्रस रिसर्च इन्स्टिटयूट सोबत एसटीजी तंत्र प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार

**जळगाव/प्रतिनिधी**



जळगाव येथील सुप्रसिद्ध सूक्ष्म सिंचन क्षेत्रातील जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या जैन इरिगेशन सिस्टीम्स लि कंपनीने आयसीएआरच्या सेंट्रल सिट्रस रिसर्च इन्स्टीट्यूट (नागपूर) बरोबर सामंजस्य करार केला. या करारानुसार कंपनीच्या सहकाऱ्यांना रोगमुक्त स्वीट ऑरेंज आणि इतर लिंबूवर्गीय फळे-मँडॅरीन, लिंबू आणि ग्रेफफ्रुट यांच्या रोपांच्या निर्मितीसाठी आवश्यक असे शूट टिप ग्राफ्टींग (एसटीजी) तंत्रज्ञान शिकविणे, त्यासंबंधी सल्ला-सेवा देवाण-घेवाण होणार आहे. विकसीत या तंत्रज्ञानामुळे सिट्रस ग्रीनिंग, ट्रीस्टझा, मोझेक आणि रिंग स्पॉट व्हायरस यासारख्या विषाणूंच्या आणि सूक्ष्म विषाणूंच्या रोगांपासून मातृवृक्ष (मदर ट्री) मुक्त असतात. हे तंत्रज्ञान म्हणजे एक प्रकारचे ऊतीसंवर्धन तंत्र आहे. या तंत्रामध्ये रूटस्टॉक हे मातीमुक्त माध्यमात वाढवले जातात. त्याच्यावर अपिकल मेरीस्टेम ग्रंथींचे डोळे कलम केले जातात. यासाठी अपिकल ग्रंथींचा एक छोटासा भाग (०.१ ते०.२ एमएम) जो विषाणूमुक्त असतो त्यांचे रूटस्टॉक वर कलम केले जाते. यापासून तयार केलेले मातृवृक्ष हे बडस्टीक लावून पुनरुत्पादन केले जातात. असे मातृवृक्ष कोणताही रोग झालेला नाही अशी तपासणी केली जाते. शास्त्रज्ञ डॉ. एन. विजया कुमारी यांनी हे तंत्रज्ञान सीसीआरआयमध्ये विकसित केले असून या सामंजस्य करारावर त्यांनी स्वाक्षरी केली. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कंपनीतर्फे डॉ.अनिल ढाके यांनी स्वाक्षरी केली. यावेळी डॉ. बी. के. यादव, सीसीआरआयचे माजी संचालक डॉ. एम.एस. लदानिया व अन्य तज्ज्ञ उपस्थित होते. मातृवृक्षाचे तत्वे व सातत्य असलेल्या जातींमध्ये वरील भाग हा लिंबूवर्गीय फळांचा भाग कलम केलेल्या रोपांना दर्जेदार फळांचे उच्च उत्पादन करण्यासाठी सर्व प्रकारच्या रोगकारक जंतूंपासून मुक्त असला पाहिजे. हरितगृहात जैन टिश्यूकल्चर पार्कमध्ये जेएसओ १ ते ५ ह्या जैन स्वीट ऑरेंजच्या रोपांचे रोगमुक्त उत्पादन केले जाते. मातृवृक्ष संवेदनशील वातावरणात हरितगृहात ठेवले जातात आणि रोग-किडीचा उपद्रव टाळता येतो. मातीमुळे रोग-कीडी उद्भवू शकतात त्यामुळे ही रोपे माती विरहीत मीडियात रोगमुक्त वाढवली जातात. ह्या एसटीजी तंत्रामुळे रोगमुक्त रोपांची निर्मिती करता येते कारण नवीन प्रजाती किंवा आयात केलेल्या प्रजाती रोपे स्वच्छ करता येतात. एवढेच नव्हे तर एखाद्या रोपाला चांगली दर्जेदार फळे येतात. पण ते रोगयुक्त असेल तर त्यालासुद्धा स्वच्छ करता येते. त्यानंतर ते मातृवृक्ष म्हणून काम करु शकते. हा दोन संस्थांचा सामंजस्य करार (एमओयु) संपूर्ण भारतभर निरोगी संत्राच्या आणि मँडारीनच्या फळबागा उभारण्यासाठी पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप (पीपीपी) मजबूत करायला एक पाऊल पुढे पडले असल्याचे निदर्शनास येते. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. तर्फे डॉ. अनिल ढाके, डॉ. बी. के. यादव आणि सीसीआरआयचे माजी संचालक डॉ. एम. एस. लदानिया यांनी सामंजस्य करारावर सह्या केल्या. सीसीआरआय तर्फे संचालक डॉ. डी. के. घोष आणि डॉ. एन. विजयकुमारी, डॉ. ए. के. दास यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. सीसीआरआयचे सगळे शास्त्रज्ञ आणि इतर कर्मचारी या प्रसंगी उपस्थित होते. सीसीआरआयचे शास्त्रज्ञ जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कंपनीच्या सहकाऱ्यांना ६ प्रशिक्षणाच्या कार्यक्रमात येत्या १४ महिन्यात प्रशिक्षण देतील. संपूर्ण भारतात आत्तापर्यंत ६ लाखाहून अधिक जैन स्वीट ऑरेंजची लागवड ३००० एकरहून अधिक शेतजमिनीत उच्च घनदाट (युएचडीपी) पद्धतीने झालेली आहे व हे प्रमाण दिवसंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमिवर हा सामंजस्य करार ही जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.ची उत्तम लिंबूवर्गीय फळांच्या देशातील प्रक्रिया उद्योगासाठी वचनबद्धता दर्शवितो.

# बटणपुर येथे बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी



**देवणी/प्रतिनिधी**

जगतज्योती विश्वगुरू महात्मा बसवेश्वर यांची ९१८वी जयंती उत्सवात साजरा करण्यात आली. या निमित्ताने महात्मा बसवेश्वर यांचा पाळणा घालण्यात आला व देवणी येथील श्री गुरूलीगेंश्वर विरक्त मठाचे मठाधीपती श्री मनिप्र सिध्दलिंग महास्वामीजी यांच्या हस्ते ध्वजारोहण व प्रतीमेचे पुजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मल्लिकार्जुनप्पा मानकरी, दिलीप पाटील नागराळकर अजित बेळकोणे, गजानन भोपणीकर, सुभाष माने, बालाजी कारभारी, सह इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष शिवराज खराबे, संगमेश्वर पाटील, राचप्पा शेणारे, संगमेश्वर जानापूरे, रमेश बिराजदार, संजीव बोळेगावे, दिनकर जान्ते, नागनाथ बिरादार, महादेव पाटील, भास्कर जान्ते, सोमनाथ बिरादार, निलेश बिरादार, महेश मलशट्टे, अजय शेनारे, शेशींकात शेनारे, साई पाटील, श्रीकांत कारभारी, संभाजी पाटील, विवेक बिरादार, गावातील सर्व समाजातील तरूणानी सहभाग नोंदविला होता.

# सोलापूरकडे जाणारा ३१ लाखांचा गुटखा मंगळवेढा पोलिसांनी पकडला



**सोलापूर/प्रतिनिधी**

कर्नाटकातील निपाणी येथून मंगळवेढा मार्गे सोलापूरकडे ३१ लाख रुपयांचा गुटखा घेऊन जाणारा ट्रक मंगळवेढा पोलिसांच्या सतर्कतेमुळे पकडण्यात आला आहे. राजू चंद्रकांत होनमाने (५८), सोमनाथ पुजारी, जबी उल्ला सय्यद उर्फ रोशन, रफिक ऊर्फ रसूल मेनन या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमवारी पहाटे तीन वाजता येथील सांगोला नाक्यावरील सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर संशयित वाहनांची तपासणी सुरू असताना माल ट्रक क्र.(एमएच १२ एचडी ७८७६) बाबत पोलिसांनी चौकशी केली असता गाडीत पाठीमागील बाजूस बांधलेले ताडपत्री सोडून पाहिले असता. यामध्ये ३१ लाखांचा गुटखा असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी ट्रक चालकाकडे हा गुटखा कोठून आणले असे विचारणा केली असता कर्नाटक निपाणी येथून आणून सांगोला मार्गे आला असल्याचे सांगितले. पोलिसांनी ११ लाख रुपयांचा माल ट्रक व ३१ लाखांचा गुटखा असा एकूण ४२ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. याची फिर्याद अन्न व औषध प्रशासनाचे उमेश भुसे यांनी दिली आहे. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. रणजीत माने यांच्या पथकाने केली आहे.

# आता भिवंडी-वाडा रात्रीची शेवटची बस पुन्हा सुरू होणार



**वाडा/प्रतिनिधी**

भिवंडी येथून वाड्याकडे येण्यासाठी रात्री ९ वाजल्यानंतर एसटीची एकही बस नसल्याने प्रवाशांना खासगी वाहनाने प्रवास करावा लागत आहे. यापूर्वी या मार्गावर रात्री १०.३० वाजता असलेली भिवंडी-वाडा ही बस पुन्हा सुरू करावी, अशी मागणी वाडा तालुका प्रवासी संघटनेच्या वतीने वाडा आगाराचे आगार व्यवस्थापक यांचे कडे निवेदनाद्वारे केली आहे. १९९६ मध्ये वाडा एसटी बस आगार सुरू झाले. तेव्हा वाडा आगाराने भिवंडी-वाडा ही रात्री १०.३० वाजता शेवटची बस सुरू केली होती. ही बस नियमित सुरू होती. करोनाच्या पार्श्वभूमीवर वाडा आगाराने काही बसफेऱ्या बंद केल्या त्यात वाडा भिवंडी वाडा ही बस सुद्धा बंद केली होती. वाडा तालुका प्रवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी वाडा आगाराचे आगार व्यवस्थापक समीर केंबुलकर यांच्याशी वाडा भिवंडी वाडा ही बस पूर्ववत सुरु करण्याच्या मागणीसाठी चर्चा केली त्याच बरोबर पालघर येथून वाड्याच्या दिशेने संध्याकाळी ६:१५ वाजता बस सुरु करण्याची मागणी केली असता या दोन्ही बस १ मे पासून नियमत सुरु करत असल्याचे केंबुलकर यांनी सांगितले. तर इतरीही काही फेऱ्या वाढविण्याची व नवीन मार्गवरील फेऱ्या सुरु करण्याबाबती चर्चा झाली. याप्रसंगी प्रल्हाद शिंदे, प्रा.किरण थोरात, विशाल मुकने अनंता सुर्वे, संजय पवार, अलकनंदा भानुशाली, विपुल आंबेकर व संजय लांडगे उवस्थित होते.

# शैक्षणिक 'लातूर पॅटर्न'च्या यशात राजमाता जिजामाताचा महत्त्वाचा वाटा -प्रा.सतीश पवार

**लातूर/प्रतिनिधी**



लातूर येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे प्रमुख प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या संकुलाच्या माध्यमातून आतापर्यंत हजारो डॉक्टर्स, इंजिनिअर्स आणि शिक्षक घडवले आहेत. सबंध देशभरात गाजत असलेल्या शैक्षणिक क्षेत्रातील लातूर पॅटर्न'मध्ये या संकुलाचा महत्त्वाचा वाटा आहे, असे गौरवोद्गार विद्या आराधना इन्स्टिट्युटचे संचालक प्रा. सतीश पवार यांनी काढले. प्रा.पवार यांनी शुक्रवारी येथील शिवनगरातील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलास भेट देवून विद्यार्थ्यांशी संवाद साधून बाळगलेले स्वप्न साकार करण्यासाठी त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे प्रमुख प्राचार्य डी. एन. वैंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रा. पवार म्हणाले की, आज लातूर ही शिक्षणाची पंढरी म्हणून उदयास आली आहे. अगदी देशभरातील विद्याथीर शिक्षणासाठी लातुरात येतात. प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या या संकुलात राजमाता जिजामाता, तुळजाभवानी, संगमेश्वर या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांसह डी. एड. व बी. एड. कॉलेजेसही आहेत. यासोबतच या संकुलाच्या माध्यमातून अत्याधुनिक असे अन्वी गर्ल्स हॉस्टेलही साकारण्यात आले आहे. या संकुलात विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जाते. त्यामुळे आतापर्यंत या संकुलातील हजारो विद्याथीर डॉक्टर्स, इंजिनिअर्स व शिक्षक बनले असून ते राज्याच्या कानाकोपऱ्यात विविध ठिकाणी सेवेत आहेत. त्यामुळे शैक्षणिक लातूर पॅटर्न'मध्ये या संकुलाचे महत्त्वाचे योगदान आहे, असे नमूद करून यापुढेही या संकुलातून असेच यशस्वी विद्याथीर घडावेत, अशी आशा शेवटी प्रा. पवार यांनी व्यक्त केली. यावेळी बोलताना प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले की, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकूल स्थापनेपासून आतापर्यंत विद्यार्थ्यांचे हित जोपासण्याचे काम करीत आहे. वेळेचे नियोजन, जादा तासिका, तज्ज्ञ अध्यापक यांच्या माध्यमातून यशस्वी व आदर्श विद्याथीर घडविण्याचे काम केले जाते. विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेवून आपले व आपल्या आई - वडिलांचे स्वप्न साकार करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रा. सतीश पवार यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना यशाचा मूलमंत्र दिला. यावेळी सोलापूर येथील प्रगती नानासाहेब घाडगे यासह अन्य विद्याथीर व विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांनी प्रमुख पाहुण्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. यावेळी प्रा. बी. बी. खटके, प्रा. एस. आर. धुमाळ, प्रा.ए.एस. खोत, एस.एम. जाधव, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते उपस्थित होते.

---

वकील : श्रीकांत स. पवार

**जाहीर नोटीस**

**वसई येथील मे. प्रथम वर्ग न्यायाधीश यांचे न्यायालयात**

चौकशी अर्ज क्र. : ७१६/२०२३

**श्रीम. सविता सुधाकर घरत .... अर्जदार**
**वय ४६, व्यवसाय - शेती**
**घर नं. २१२, चिंचोटी, लाईन पाडा, पोस्ट कामण,**
**ता. वसई, जि. पालघर**

**विरुद्ध**

**ग्रुप ग्रामपंचायत पोमण**
**द्वारा ग्रामसेवक ग्रामपंचायत पोमण .... सामनेवाले**

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडिल **कै. भाऊराव अर्जुन वळवी** यांचा मृत्यू दिनांक १०/०५/१९८८ रोजी मु. पोमण, गवळीपाडा, पो. कामण, ता. वसई, जि. पालघर येथे अल्पशा आजाराने त्यांच्या राहत्या घरी झालेला आहे याबाबत अर्जदाराने मा. न्यायालयामध्ये सदर मृत्यू दाखल्याचा आदेश मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. तरी ज्याकोणास हरकत, हक्क, हितसंबंध, अडथळा असेल त्यांनी स्वतः अथवा आपल्या वकिलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वसई या न्यायालयात आपले म्हणणे/हरकत द्यावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंती प्रमाणे मृत्यू दाखला मिळणे बाबतचा आदेश देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचर केला जाणार नाही.

आज दिनांक २०/०४/२०२३ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- लिपीक | कोर्टाचा शिक्क | सही/- सहाय्यक अधिक्षक

# सुसंस्कारित आणि संघटीत समाज हा उज्वल भविष्याचा आरसा असतो – श्री संत १०८ सुखदेव महाराज



**लातूर/प्रतिनिधी**

राष्ट्रसंत गुरु रविदास महाराज यांची मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा देवणी येथे रविवारी मोठ्या थाटामाटा उत्सवात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित जनसमुदायाला आशीर्वचन देताना ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेस कमिटीचे प्रदेश सदस्य मलिकार्जुनप्पा मानकरी, भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते नामदेव कदम, देवणीचे तहसीलदार सुरेश घोळवे, देवणीच्या नगराध्यक्षा डॉ.किर्तीताई घोरपडे, उपनगराध्यक्ष अमित मानकरी, संत गुरु रविदास मूर्तीदाते माधव शेगावकर, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राज्य उपाध्यक्ष नवनाथ गायकवाड होते. मंचावर अमोल वाघमारे, ललितताई वाघमारे, दीपक अरविंद कांबळे, शिवाजी लकवाले, प्रा.भगवान गायकवाड, वैजनाथ लुल्ले, रशीद मल्ले वाले, अटल धनुरे, देविदास पतंगे, देवणी काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष जावेद तांबोळी, शिवसेना शहराध्यक्ष दीपक मळभागे, नगरसेवक अमित सूर्यवंशी, प्रा.महादेव मळभागे, व्यंकट बन, बामसेफ देवणी तालुकाध्यक्ष शेख मुजीब, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे लातूर जिल्हा अध्यक्ष मधुकर वाघमारे, संघटनेचे महिला जिल्हाध्यक्षा उर्मिला वाघमारे, संघटनेचे उदगीर तालुकाध्यक्ष रुक्मिणी शिंदे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्र्वर सूर्यवंशी, शिवाभाऊ कांबळे, धर्माजी उदबाळे, गोपाळ सूर्यवंशी, प्रा. गणेश कांबळे मुरूमकर, चंद्रकांत मोठेराव, मोतीराम कांबळे वडगावकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री.संत १०८ सुखदेव महाराज यांनी व्यक्ती पेक्षा सदैव त्याची कृती ही अजरामर असते, व्यक्ती हा आयुष्यापुरता मर्यादित असतो तर त्याची कृती आणि नाव हे सर्वकालीन चिरंतन आणि अमर्यादित असते त्यासाठी तुम्ही तुमच्या भौतिक सुखासाठी, धन संचयासाठी लोकांच्या नजरेत न उतरता, समाजाच्या नजरेत भरण्यासारखं कार्य करा., मी आणि माझे या स्वार्थी विचारा ऐवजी आम्ही आणि आपले असे आदर्श विचार अंगिकारा असे ही आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.भगवान गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन रसिका महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.सुधीर नाबदे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अमर टिळे, लक्ष्मण गायकवाड, सुभाष टिळे, सोनाजी टिळे, बालाजी टिळे, दयानंद कांबळे, राजकुमार लाडवते, धोंडीराम गायकवाड, शिवाजी टिळे, अमरनाथ देवणीकर, अंकुश टिळे, साईनाथ गायकवाड, यांच्यासह संघटनेतील पदाधिकारी कार्यकर्ते व समाज बांधवांनी अथक परिश्रम घेतले. या सोहळ्याला जिल्ह्यातील व देवणी, उदगीर, निलंगा तालुक्यातील महिला, बालक यांच्यासह सर्व समाजबांधव व सर्वधर्मीय लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरात बाल गोपाळासह महिला भक्तांनी काढलेली विशाल मिरवणूक सर्व उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती.

# औसा तालुक्याला अवकाळी पावसाचा तडाखा; वीज पडून ५५ वर्षीय शेतकरी मृत्युमुखी

**औसा/प्रतिनिधी**

मागील दोन दिवसापासून औसा तालुक्यामध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने थैमान घातले असून प्रचंड मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होऊन औसा तालुक्यामध्ये जीवित व वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे अवकाळी पावसाचा तालुक्याला तडाखा बसला आहे दिनांक २७ एप्रिल रोजी भंगेवाडी





येथील बब्रुवान कंदगुळे या शेतकऱ्याची बैलजोडी व गाय ही तीन जनावरे वीज पडून ठार झाली ही घटना ताजी असतानाच शुक्रवार दिनांक २८ एप्रिल रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास तालुक्यातील टेंभी येथील शौकत इस्माईल सय्यद वय ५५ वर्ष या शेतकऱ्याच्या अंगावर वीज पडल्यामुळे शेतकऱ्याचा मृत्यू झाला तसेच यावेळी वीज चमकल्यामुळे काही जनास दृष्टीदोष निर्माण झाल्याचेही वृत्त हाती आले आहे हवामान खात्याने दोन मेपर्यंत अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविला असल्याने तालुक्यातील शेतकरी जनतेत घबराट पसरली आहे शेतकऱ्यांचे पशुधन शेतामध्ये असल्यामुळे व शेतावर पेरणीपूर्व मशागतीची तसेच उशिरा पेरणी झालेल्या शेतकऱ्यांच्या रब्बी पिकाच्या कापणीची कामे सुरू आहेत तसेच साखर कारखाने सुरू असल्यामुळे ऊसतोड कामगारांची कामे शेतात सुरू आहेत. मेंढपाळ वर्गही उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे पाला ठोकून आपल्या कळपासह शेतावर राहत असल्याने पशुधनाचे व पशुपालकांच्या जीवेचास धोका निर्माण झाला आहे दोन दिवसापासून पडलेल्या वादळी वाऱ्याच्या आणि पावसाच्या संकटामुळे शेतकऱ्याच्या शेतातील विजेचे खांब तसेच झाडे उन्मळून पडली आहेत भाजीपाला उत्पादक व फळबागा उत्पादक शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नासाडी झाली आहे. द्राक्ष बागाचे मोठी हानी झाली असून आंबा या फळ पिकाची मोठी हानी झाल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत परिणामी औसा तालुक्यामध्ये अवकाळी पावसामुळे जीवित आणि आर्थिक नुकसान झाल्यामुळे शेतकरी जनता त्रस्त झाली आहे.

# रमजान महिन्यातील रोजा मनापासुन करणाऱ्यांच्या हातून दुष्कर्म अशक्य – पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील




**वाडा/प्रतिनिधी**

रमजान महिन्यातील रोजा हा अतिशय कडक उपवास असून या महिन्यात शरीरच्या कोणत्याही अवयवा कडून कसलेही दुष्कर्म होणार नाही याची काळजी घेतली जात असल्याने हा उपवास खूप काटेकोरपणे पाळाला जातो. त्यामुळे या महिन्यातील उपवास मनापारून करणाऱ्या व्यक्तीं कडून कसलेही दुष्कर्म होणे अश्यक्य असल्याचे मत पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केले. ते कुडूस येथे जनसंवाद अभियान अंतर्गत आयोजित इफ्तार पार्टीच्या वेळी बोलत होते. पाटील यांनी ईद विषयी सखोल माहिती देत मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या व त्यांच्या सोबत फराळाचा आस्वाद घेतला. या प्रसंगी आमदार शांताराम मोरे, आरपीआयचे जिल्हा अध्यक्ष डी.जी.भोईर यांनी आपले विचार मांडले व रमजानच्या शुभेच्छा दिल्या. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या संकल्पनेतून जिल्हा भरात विविध कार्यक्रम राबविले जात आहेत. सध्या मुस्लिम बांधवांचा रमजान महिना चालू असून त्यानिमित्त कुडूस येथील राधेकृष्ण नगर येथे सोमवारी (१७ एप्रिल) इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. याप्रसंगी पोलीस निरीक्षक दशरथ पाटील, स्वाभिमान संघटनेचे जिल्हा अध्यक्ष बंटी पाटील, सचिन पाटील, इरफान सुसे, जि.प.सदस्य राजेश मुकणे, स्वप्नील जाधव, मंगेश पाटील, उद्योजक यासीम चिखलीकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनेश पाटील यांनी केले तर पोलीस उपनिरीक्षक संतोष वाघाचौरे यांनी आभार व्यक्त केले.

# भिवंडीतील उड्डाणपुलाखाली मोठ्या प्रमामात साचले कचऱ्याचे ढीग; पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरात कचऱ्याची समस्या गंभीर बनली आहे.शहरातील अनेक ठिकाणी मुख्य चौकांसह अंतर्गत रस्त्यांच्या कडेला कचऱ्याचे ढीग साचले आहेत. त्यातच आता मनपा प्रशासनाच्या दुर्लक्षित कारभारामुळे उड्डाणपुलाखाली सुशोभीकरण करण्यात आलेल्या जागेवरच कचऱ्याचे ढीग साचलेले पाहायला मिळत आहेत. महापालिकेच्या या दुर्लक्षित कारभारामुळे भिवंडी मनपाच्या स्वच्छ भारत अभियानाचा पुरता बोजवारा उडाला असल्याचे चित्र शहरात ठिकठिकाणी साचलेल्या कचऱ्यांच्या ढिगांवरून पाहिला मिळत आहेत.




शहरातील वंजारपट्टी नाका येथे असलेल्या स्वर्गीय एपीजे अब्दुल कलाम उड्डाणपुलाखाली महापालिका प्रशासनाने लाखो रुपये खर्च करून उड्डाणपुलाखाली सुशोभीकरण केले आहे. मात्र या सुशोभीकरण केलेल्या जागेवरच नागरिकांसह हॉटेल व्यावसायिकांनी कचरा टाकण्यास सुरुवात केली असून या सुशोभीकरण झालेल्या ठिकाणीच आता कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत. मागील आठ महिन्यांपासून भिवंडी महापालिकेतील लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपला असल्याने महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांसह प्रशासकीय अधिकाऱ्यांवर लोकप्रतिनिधींचा वचक नसल्याने प्रशासकीय कार्यकाळात शहरातील कचऱ्याची समस्या बिकट बनली आहे. शहर स्वच्छतेसाठी मनपा आयुक्त विजयकुमार म्हसाळ योग्य ती उपाययोजना राबविणार का याकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरून....

## मध्यस्थीचा प्रयत्न त्याच्या अंगाशी ...

स्पर्धा सुरु झाली असून गुन्हेगारीगारीचं प्रमाणही वाढलं आहे. नाशिकमध्ये अशीच एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सोशल मिडीयावर तरूणांच्या झालेल्या भांडणात एकाला जीव गमवावा लागला आहे. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आलं असून यात सहा विधीसंघर्ष बालकांसह तीन तरुणाचा समावेश आहे. नाशिकच्या सिडको परिसरात राहणाऱ्या तरुणांनी सोशल मिडीयावर लाईव्ह केलं होतं. या लाईव्हमध्ये संग्राम शिरसाट या तरुणाने एक आक्षेपार्ह विधान केल. याचा राग मनात धरून संशयित आरोपींनी संग्राम शिरसाट याला मारहाण केली. पण दोघांच्या भांडणात मध्यस्थी करणाऱ्या तिसऱ्याच तरुणाचा यात जीव गेला. घटनेच्या दिवशी संग्राम शिरसाट हा आपले मित्र परशुराम नजान, रोहित पाटील आणि अभिषेक बच्छाव यांच्याबरोबर जेवायला सावता नगर इथल्या एका हॉटेलमध्ये गेले होते.

यावेळी संशयित आरोपींनी हॉटेलमध्ये जाऊन संग्राम शिरसाट याला जाब विचारला. हा वाद वाढत गेला आणि भांडणाला सुरुवात झाली. पण त्याचवेळी संग्राम शिरसाटचा मित्र परशुराम नजाम याने मध्यस्थी करत संग्रामला हॉटेलच्या बाहेर नेलं. त्यानंतर परशुराम हॉटेलच्याबाहेर उभा असताना संशयीत आरोपीने अचानक येऊन त्याच्या डोक्यात पेव्हर ब्लॉक घातला. यात परशुराम गंभीर जखमी झाला. परशुरामवर हल्ला केल्यानंतर आरोपींनी तिथून पळ काढला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या परशुरामला मित्रांनी तात्काळ रुग्णालयात दाखल केलं, पण उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मंगळवारी रात्री उशिरा परशुराम याच्या खून प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा करण्यात आला. हल्ल्याची संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली होती. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध घेतला आणि २४ तासाच्या आत संशयित आरोपींना अटक केली. यात सहा विधीसंघर्ष बालकांचा समावेश आहे. दरम्यान, पुण्यातील कोंढवा परिसरात एक ज्येष्ठ नागरिकाची डोक्यात फरशी घालून हत्या करण्यात आली. हकीमद्दिन बारोट असं मृत व्यक्तीचं नाव असून ते ६६ वर्षाचे होते. याप्रकरणी ३२ वर्षाच्या महेश ओव्हाळ या तरुणाला अटक केली आहे. हकीमद्दिनने महेशला शिवीगाळ केली होती, याचा राग मनात धरून महेशन त्यांची हत्या केली. रविवारी रात्री मद्यपान केल्यानंतर मयत व्यक्तीने आरोपीला शिवीगाळ केली होती. याच रागातून आरोपीने डोक्यात फरशी मारून खून केला.

## पूर्ववैमन्यस्यातून डाव साधला...

वाद मिटवण्याऐवजी या वादाला खतपाणी घालण्याचा प्रकार झाला. दोन कुटुंबातील वादाला तोंड फोडून दोन्ही कुटुंबांना बोलतं केलं असतं, तर दोघा कुटुंबीयांच्या मनातील जळमट बाहेर पडायला वाव मिळाला असता. त्यातून वादावर पडदा पडला असता. जावरे आणि पेंढारकर कुटुंबीयांतील वादाचा रविवार दि. ६ एप्रिल २०२३ रोजी मोठा स्फोट झाला. दि. ११ एप्रिल रोजी महात्मा फुले जयंती आणि दि. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती होती. या निमित्ताने पेंढारकर आणि जावरे कुटुंबीय उत्सव साजरे करण्याच्या मनस्थितीत होते. गेल्याच आठवड्यामध्ये नंदुरबारमध्ये दोन गटात वाद होऊन हाणामारी झाली, पण पोलीस प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप केल्याने दंगल आटोक्यात आली. याच पार्श्वभूमीवर या दोन महात्म्यांचे उत्सव साजरे करतांना ते शांततेत पार पडावेत यासाठी पोलीस सतर्क होते. अशातच रविवार दि. ६ एप्रिल रोजी दुर्दैवी घटना घडली. नंदुरबारमधील आंबेडकर चौकात कैलास आप्पा पेंढारकर, कृष्णा आप्पा पेंढारकर आदी रहातात. पेंढारकर कुटुंबीयांची नंदुरबारमधील उमापती महाले मंदिराजवळ शेती आहे. त्याच परिसरात पेंढारकर कुटुंबीयांनी दुकाने काढून ती भाड्याने दिली आहेत, तर पेंढारकर कुटुंबीयांचे नातेवाईक भगवान गिरधर जावरे, स्वप्निल उर्फ रवि भगवान जावरे, सागर भगवान जावरे, आकाश उर्फ शंकर भगवान जावरे हे नंदुरबारमधील चौधरी गल्लीत वास्तव्यास आहेत. मागच्या वर्षी म्हणजे २०२२ साली आंबेडकर जयंतीनिमित्त जमवलेल्या वर्गणीवरून पेंढारकर आणि जावरे कुटुंबीयांमध्ये वाद झाला होता. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले होते. तो बाद अजूनही निवळला नव्हता. तोच वाद यावर्षी उफळून आला. रविवार दि. ६ एप्रिल २०२३ रोजी कृष्णाप्पा पेंढारकर हा दुपारी १ वाजता उमापती महादेव मंदिराजवळ उभा असतांना स्वप्निल उर्फ रवि भगवान जावरे, आकाश उर्फ शंकर भगवान जावरे, सागर भगवान जावरे आणि भगवान गिरधर जावरे, हे अचानक कृष्णाप्पासमोर दत्त म्हणून उभे राहिले, तेही सशस्त्र! कृष्णाप्पा पेंढारकर याला त्यांनी घेरले आणि म्हणाले, तुझे दिवस भरले असे म्हणत त्याच्यावर पिस्टलने बेछूट गोळ्या झाडल्या. एवढ्यावर ते थांबले नाहीत, तर त्यांनी प्राणघातक शस्त्रानेही कृष्णाप्पावर हल्ला करून त्याला घायाळ केले, शिवाय लाठ्या-काठ्यांनीही कृष्णाप्पाला चोप दिला.

अचानकरित्या झालेल्या हल्ल्यात कृष्णाप्पा गंभीर जखमी झाला व तो रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळला. इकडे कृष्णाप्पाचा शोध घेत घटनास्थळी पुतण्या शेखर पेंढारकर पोहोचला असता त्याला भयानक दृष्य दिसून आले. त्याचवेळी कृष्णाप्पावर प्राणघातक हल्ला करून जावरे कुटुंबीय पळून जात असलेले शेखर पेंढारकरने पाहिले. आपल्या चुलत्याची अवस्था पाहून त्याने आपल्या वडीलांना कैलास आप्पा पेंढारकर यांना मोबाईलवरून घटनेची माहिती दिली. भावाला जावरे कुटुंबीयांनी मारल्याचे समजताच कैलास पेंढारकर घटनास्थळी पोहोचले. तेथे कृष्णाप्पा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. दरम्यान या घटनेची माहिती पोलीस ठाण्यात देण्यात आली. पोलीस अधीक्षक पी. आर. पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागातील पोलीस निरीक्षक किरणकुमार खेडकर, शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर, नंदुरबार तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल पवार, नियंत्रण कक्षाचे पोलीस निरीक्षक नरेंद्र भदाणे, उपनगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनेश भदाणे, शहर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रतापसिंग मोहिते, उपनिरीक्षक प्रविण पाटील यांनी आपल्या फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली व तणावपूर्ण परिस्थितीवर नियंत्रण मिळवून कृष्णाप्पाला जिल्हा शासकीय रूग्णालयात नेले. प्राथमिक तपासणीअंतीच वैद्यकीय सूत्रांनी कृष्णाप्पाला मृत घोषीत केले. कृष्णाप्पाचा खून झाल्याची वार्ता वाऱ्यासारखी पूर्ण नंदुरबार शहरात पसरली.

या घटनेमुळे पोलीस यंत्रणेवर ताण पडला. फुले-आंबेडकर जयंतीच्या वर्गणीवरूनच आणि त्या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर घटना घडल्यामुळे पोलीस यंत्रणेला शहरात दंगल घडू नये म्हणून सतर्क रहावे लागले. यावेळी पोलिसांनी पेंढारकर कुटुंबीयांना विश्वासात घेतले आणि शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार पार पडला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक पी.आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे किरणकुमार खेडकर, शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर यांनी अविश्रांत परिश्रम करून चौघाही संशयित हल्लेखोरांना ताब्यात घेवून त्यांच्याविरोधात कैलास आप्पा पेंढारकर यांनी दिलेल्या फिर्यादीच्या आधारे भा.दं. वि. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून चौघाही संशयितांना गजाआड केले.

## क्रिकेटच्या मैदानावर घडली क्राईम स्टोरी...

नामक मुलाने क्रिकेट खेळताना बॅट तोडली, त्याची भरपाई म्हणून यशने त्याच्याकडून तीनशे रुपये वसूल केले. याचा राग मनात धरून सुमितने मलकापुरातील नूतन हायस्कूलच्या मैदानावर यशच्या पोटात धारदार चाकूने वार केले. यावेळी यश रक्ताच्या थारोळ्यात पडला होता, त्याला तात्काळ आधी मलकापूर त्यानंतर बुलढाणा येथे खाजगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आलं होतं. मात्र, उपचारादरम्यान यशचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. केवळ तीनशे रुपयावरून हा वाद विकोपाला गेला आहे. यात एका अल्पवयीन मुलाचा जीव गेला आहे. पोलिसांनी अल्पवयीन आरोपी सुमित पवार विरोधात कुणाचा गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेने मलकापूर परिसरात एकच खळबळ माजली आहे. व्हॉटसपद्वारे महिलेशी अश्लील चॅटींग करणाऱ्या एका सायबर पोलिसांनी अटक केली. ही कारवाई १५ मार्च रोजी रात्री उशिरा करण्यात आली. याप्रकरणी पीडितेने सायबर पोलीस स्टेशनमध्ये १७ जानेवारी रोजी तक्रार दिली होती. दिलेल्या तक्रारीत म्हटले होते की, कोणीतरी अज्ञात व्यक्तीने व्हर्च्युअल मोबाइल क्रमांकावरुन व्हाटसपद्वारे अश्लील चॅटींग करुन पीडित महिलेला लज्जा वाटेल असे मेसेज पाठविले. ऐवढेच नव्हे तर ऑनलाइन पाठलाग करुन त्याची ओळख लपवून शिविगाळ केली.

त्या महिलेला तु राहतेस त्या गावी येऊन बदनामी करेन' अशी धमकी दिली. अशा तक्रारीवरुन सायबर पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला होता. दरम्यान तपासात मिळालेल्या तांत्रिक व गोपनिय माहितीच्या आधारे फिरोज ताज मोहम्मद पठाण (रा.तळणी, ता. मंठा,जि.जालना) यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

पान ८ वरून....

## औसा कृषी उत्पन्न बाजार समिती ...

ॲड अरविंद कुलकर्णी, अँड मुक्तेश्वर वागदरे, कंठप्पा मुळे यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी एक दिलाने निवडणुकीचे शिस्तबद्ध नियोजन करून महाविकास आघाडी पासून औसा कृषी उत्पन्न बाजार समिती हिसकावण्यात यश संपादन केले आहे. शुक्रवार दि. २८ एप्रिल २०२३ रोजी ०४ वाजता मतदान प्रक्रिया संपल्यानंतर ०५ वाजता प्रत्यक्ष मतमोजणी सुरुवात झाली. श्री मुक्तेश्वर विद्यालय औसा येथील सभागृहामध्ये मतमोजणी करत बंदोबस्तामध्ये सुरू झाल्यानंतर या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे सर्वच उमेदवार विजयी झाले. विजय उमेदवार मतदार संघ नावे पुढीलप्रमाणे अनुसूचित जाती जमाती (गट) कावळे मोहन विष्णू (६०२), ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल घटक : भोसले गोविंद काशिनाथ (५७५), ग्रामपंचायत सर्वसाधारण (गट) जाधव राधाकृष्ण बालाजी (५७३), वळके रमेश विठ्ठल (५४०), इतर मागासवर्गीय (गट) नरहरी विकास पंडितराव (५१५), संस्था सर्वसाधारण (गट), कोपरकर प्रवीण प्रभाकरराव (४८३), लंगर संदिपान मनोहर (४७८), सोनवणे चंद्रशेखर भाऊराव (४७५), बिराजदार युवराज शाहूराज (४७२), काकडे प्रकाश चंद्रकांत (४७२), धुमाळ अजित सिद्राम (४७१), राचट्टे भीमाशंकर प्रभू आप्पा (४७१), सर्वसाधारण महिला गट- झिरमिरे चंद्रकला पुरुषोत्तम (५०४), वीर वीर संतोषी अशोक (४९४), भटक्या विमुक्त जाती गट- कुलकर्णी ईश्वर रामविलास (५१५), व्यापारी गट आवटी सुरेश सिद्धाप्पा (२८१), जाधव धनराज जय हिंद (२६६), हमाल मापाडी गट - पुंड शंकर शहाजी (४५) या उमेदवारांनी विजय संपादन केला असून निवडणूक व मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी तहसीलदार भरत सूर्यवंशी, निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था एस के कदम, पोलीस निरीक्षक शिवशंकर पटवारी यांच्यासह निवडणूक विभागामध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांनी रात्री उशिरापर्यंत चोख कामकाज केले. भाजप कार्यकर्त्यांनी फटाक्याची आतिषबाजी गुलाल उधळून जल्लोष साजरा केला.

## केईम हॉस्पिटलसमोरील टॅक्सी...

आणि हा विषय आमच्या अखत्यारीत येत नाही तुम्ही वाहतूक पोलिसांकडे जावा असे सांगितले. त्यानंतर जाधव हे भारतमाता सिनेमा जवळ असलेल्या वाहतूक चौकीत गेले, पण तिथेही त्यांची तक्रार नोंदवून घेतली नाही. हा सर्व प्रकार संतापजनक आहे. हॉस्पिटल जवळ रुग्णाचे भाडे नाकारणाऱ्या टॅक्सीवाल्या विरूद्ध पोलिस तक्रार घेणार नसतील, तर मग त्यांनी जायचे कुठे? म्हणूनच या प्रकरणाची सरकारने गंभीर दखल घेऊन कोणत्याही हॉस्पिटल समोर रुग्णांना टॅक्सीतून नेण्यास नकार देणाऱ्या टॅक्सी वाल्यांवर केवळ भाडे नाकरल्याबद्दल दंडात्मक कारवाई न करता त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करावा. तसेच जाधव यांची तक्रार घेण्यास नकार देणाऱ्या भोईवाडा पोलिस ठाण्याच्या पोलिस अधिकारी आणि वाहतूक पोलिसांवर कारवाई व्हायला हवी.

# लातूर-पुणे इंटरसिटीसह इतर गाड्या सुरू करण्याची मागणी

## रेल्वे राज्यमंत्री दानवे यांचा सकारात्मक प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर-पुणे, कोल्हापूर-जालना,परळी-मुंबई या गाड्या सुरू कराव्यात यासह अधिस्वीकृतीधारक पत्रकारांची ५० टक्क्यांची सवलत पूर्ववत करावी, अशी मागणी मध्य रेल्वेच्या महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक झोनल रेल्वे उपभोक्ता सल्लागार समितीचे सदस्य निजाम शेख यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांना निवेदन दिले असून या मागण्यांना दानवे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत मागण्यांची पूर्तता करण्याचे आश्वासन दिले. रेल्वे राज्यमंत्री दानवे पाटील नुकतेच जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. निजाम शेख यांनी त्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.यावेळी खा.सुधाकर शृंगारे, आ.संभाजीराव पाटील, माजी आमदार पाशा पटेल, गोविंद केंद्रे, गुरुनाथ मगे, दत्ता सुरवसे यांच्यासह रेल्वे अधिकारी उपस्थित होते. नांदेड-पुणे ही जालना व छत्रपती संभाजीनगर मार्गे जाणारी गाडी पुणे येथे १६ तासांपेक्षा अधिक थांबलेली असते. उन्हाळी हंगामातील गर्दी कमी करण्यासाठी लातूर-पुणे इंटरसिटी म्हणून ही गाडी सोडावी.लातूरसह धाराशिव, बीड, परळी, नांदेड व सोलापूर जिल्ह्यातील प्रवाशांचा यामुळे फायदा होणार आहे. पंढरपूर, कुर्डूवाडी, लातूर मार्गे कोल्हापूर-जालना ही साप्ताहिक गाडी सुरू करावी अशी मागणी शेख यांनी केली आहे. कोल्हापूर येथे गाडी क्रमांक ११०४५-४६ दोन दिवस थांबलेली असते. ती गाडी या मार्गे चालवता येऊ शकते. कोल्हापूर येथील महालक्ष्मी तसेच पंढरपूर येथील विठ्ठलाच्या दर्शनासाठी भक्तांना ही गाडी उपयोगी ठरेल. मुंबई-बिदर ही गाडी आठवड्यातून एक दिवस धावते. मुंबईत ही गाडी ३६ तास थांबलेली असते.या गाडीचा तिरुपती पर्यंत विस्तार करावा. पुणे, लातूर, खानापूर, हुमनाबाद, गुलबर्गा, वाडी, गुलकंद या मार्गे ही गाडी चालवल्यास भाविकांचा लाभ होणार आहे. लातूर जिल्ह्यातून जवळपास २ हजार प्रवासी खाजगी वाहनांनी जीव धोक्यात घालून तिरुपती येथे दर्शनाला जातात. ही गाडी सुरू झाली तर भाविकांची मोठी सोय होणार आहे. लातूर, कुर्डूवाडी, पुणे या मार्गे परळी-मुंबई ही गाडी सुरू केली तर मुंबईस जाणाऱ्या प्रवाशांना लाभ होणार आहे. उन्हाळ्याचा विचार करता लातूर-मुंबई उन्हाळी सुट्टी स्पेशल गाडी सुरू करावी, अशी मागणीही निजाम शेख यांनी केली आहे. यातून रेल्वेचाही आर्थिक लाभ होणार आहे. हरंगुळ येथे रेल्वे कोच कारखाना आहे. याच परिसरात केंद्रीय राखीव पोलीस दलाचे प्रशिक्षण केंद्र आहे. यामुळे प्रशिक्षणासाठी येणाऱ्या महिला व पुरुष कर्मचाऱ्यांची सोय लक्षात घेता हरंगुळ येथे सर्व रेल्वे गाड्यांना थांबा असणे आवश्यक आहे. या संदर्भात अधिकाऱ्यांनी खा. सुधाकरराव शृंगारे यांना विनंती केलेली आहे. आपण या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी मागणी निजाम शेख यांनी निवेदनात केली आहे. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्यासह रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष अनिलकुमार लाहोटी, मध्य रेल्वेचे महाप्रबंधक आणि लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना हे निवेदन सादर करण्यात आले आहे.

# राम हे सत्य व लक्ष्मण हे समर्पणाचे प्रतिक – रामायणाचार्य ह.भ.प.रामराव ढोक महाराज



**लातूर/प्रतिनिधी**

राम हे सत्य तर लक्ष्मण हे समर्पणाचे प्रतिक आहे. त्यामुळे मानवाच्या जीवनात सत्य आणि समर्पणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. संपूर्ण रामायण समजावून घेण्यासाठी राम जन्म, सज्जनांची संघटना, दुर्जनांचा नायनाट आणि रामराज्य या चार गोष्टी महत्वाच्या आहेत. असे मौलिक विचार रामायणाचार्य ह.भ.प.श्री.रामराव ढोक महाराज यांनी व्यक्त केले. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे व समस्त गावकरी मंडळ, रामेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने संत श्री गोपाळबुवा महाराज अखंड हरिनाम सप्ताह व श्री राम कथेचे आयोजन रामेश्वर (रुई) येथे करण्यात आले होते.

या प्रसंगी त्यांनी राम कथेचा उलगडा व राम आणि रावण यांच्या युद्धांचे वर्णन सांगितले. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्र्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते. यावेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, राजेश कराड, रामेश्वरचे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड, प्रगतीशील शेतकरी काशीराम दा. कराड, कमल राजेखाँ, सौ. उषा विश्वनाथ कराड, आदिती राहुल कराड व रामेश्वरच्या पंचक्रोशितील भाविक उपस्थित होते. रामराव ढोक महाराज म्हणाले, मानवाचे मन हे सर्वात चंचल आहे. त्याला ईश्र्वराच्या म्हणजेच रामाच्या चरणी अर्पण करा तर सर्व गोष्टी साध्य होतात. परमार्थाने मानवी मन शुध्द व स्वस्थ राहते. मानवाने कधीही युद्धाच्या भूमिकेत नसावे त्यात घरातील मंडळींचे सर्वाधिक नुकसान होते. जीवन कसे जगावे, मर्यादांचे पालन कसे करावे, एक आदर्श पूत्र कसा असावा या गोष्टींचे पालन सर्वांनी करावे. हरीनाम, अन्नदान, विनम्रता आणि अभिमान या गोष्टीचे पालन जीवनात सर्वांनी करावे. यावेळी ढोक महाराज यांनी राम आणि रावण यांच्या युद्धांचे वर्णन करून मानव जीवनात शांतीचे स्थान किती महत्वाचे आहे हे सांगितले. त्यांनी सांगितले की, साधू संतांचा अपमान देवता सुद्धा सहन करत नाही. त्यामुळे कोणीही त्यांना त्रास देऊ नये. प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, भारतीय संस्कृती, परंपरा व तत्वज्ञानाचे मूर्तिमंत प्रतिक म्हणून प्रभू श्रीरामाकडे पाहिले जाते. रामेश्वराचे नाव संपूर्ण जगभरात मानवतेचा व विश्र्वशांतीचा संदेश देणारे गाव म्हणून ओळखले जात आहे. त्याग आणि समर्पणाचे प्रतिक म्हणून रामाकडे पाहिले पाहिजे. भारतातील सर्व धर्म ग्रंथ हे खरे जीवनग्रंथ आहेत. कसे जगावे आणि कसे जगू नये याची शिकवण आपल्याला देत आहेत. या वेळी रामेश्र्वरच्या पंचक्रोशितील भाविक भक्त आणि माता भगिणी मोठ्या संख्येनी सहभागी झाल्या होत्या. ह.भ.प. शालिकराम खंदारे यांनी प्रास्ताविक केले.

# भिवंडीतील वाहतूक कोंडीत अडकली रुग्णवाहिका; मनपाच्या सुशोभीकरणाचा प्रवाशांना बसला फटका



**भिवंडी/अभिजित हिरे**

शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट बनली असून महापालिकेच्या मुख्यालयासमोरच प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे.या वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका करण्यात वाहतूक विभागाला पुरता अपयश आलेले आहे. महापालिका मुख्यालयाच्या समोर असलेल्या शांतीनगर गैबी नगर रस्त्याच्या समोर उड्डाणपुलाखाली करण्यात येत असलेल्या सुशोभिकरणामुळे उड्डाणपुलाखालील रस्ता बंद करण्यात आला आहे.त्यामुळे शांतीनगरकडे जाणारी वाहने जकातनाका येथून विरुद्ध दिशेने येत असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. कोट्यावधी रुपये खर्च करून एम एम आर डी ए च्या माध्यमातून शांतीनगर, गैबी नगर रस्ता रुंदीकरणासह काँक्रेटीकरण करण्यात येत आहे. मात्र कोट्यावधी रुपये खर्चूनही सुशोभीकरणच्या नावाने उड्डाणपुलाखालील रस्ता बंद असल्याने वाहन चालकांना शांतीनगरकडे जातांना मोठी अडचण निर्माण झाली आहे. या परिसरात रिक्षावाले भर रस्त्यात रिक्षा उभी करून सीट भरत आहेत. त्यामुळे या ठिकाणी नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. गुरुवारी दुपारी या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका अडकून पडली होती.त्यामुळे ही वाहतूक कोंडी नागरिकांच्या जीवावरच उठली असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. केवळ सुशोभीकरणाचे नाव पुढे करत महानगरपालिका प्रशासन या वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी कोणतेही प्रयत्न करताना दिसत नाही. महापालिका प्रशासनाच्या या आडमुठी धोरणाचा फटका शहरातील वाहतूक पोलिसांसह नागरिकांना सहन करावा लागत आहे.

# जेऊर येथील सामुदायिक २२ जोडप्यांचा विवाह सोहळा उत्साहात संपन्न

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथील श्री काशिलिंग देवस्थान ट्रस्ट व श्री काशिलिंग बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने आयोजित सामुदायिक विवाह सोहळ्यात २२ जोडपी विवाहबद्ध झाले. याच वेळी सामाजिक बांधिलकीचा उपक्रम म्हणून सध्या देशसेवेसाठी सीमेवर तत्परतेने कार्य करीत असलेल्या २८ सैनिक बांधवांचा तसेच अक्कलकोट तालुक्यातील चार शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांचा विशेष सन्मान सोहळा देखील यावेळी संपन्न झाला. सदर सामुदायिक विवाह सोहळा आणि सैनिक सन्मान सोहळा हे दोन्ही अतिशय दिमाखदार पद्धतीने आणि शानदार रित्या संपन्न झाले. यावेळी काशी जगद्गुरू डॉ.मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी, खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, श्री शिवयोगी शिवाचार्य महास्वामी, श्री अभिनव बसवलिंग महास्वामी, सद्गुरू पांडुरंग महाराज, पिरजादे बाबा, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, कपिल शिंदे, सिद्धार्थ गायकवाड, आनंद तानवडे, अशपाक बळोरगी, गुरुशांत पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. श्री काशीलिंग देवस्थान ट्रस्ट व बहुऊद्देशिय संस्थेच्या वतीने यंदा जेऊरला कोरोनाकाळ वगळता सलग ८व्या वर्षी सामुदायिक विवाह सोहळा आयोजीला गेला होता. या संस्थेत एकूण २०० मित्रपरिवार सदस्य एकत्र येऊन तन, मन धनाने योगदान देत आहेत. काशीलिंग बहुउद्देशीय संस्थेच्या मल्लिकार्जुन पाटील व मित्रपरिवारांकडून ७ वर्षात १३४ जोडपे विवाहबद्ध झाली आहेत तर चालू वर्षी सुद्धा २२ जोडप्यांचा विवाह सोहळा त्यात्या धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी गावातील मुख्य रस्त्यावरून वधू वरांची मिरवणूक काढण्यात आली. सुग्रास भोजन, वऱ्हाडी मंडळींसाठी शिदोरी बांधून देणे आदींची व्यवस्था केली गेली होती. या विवाह सोहळ्याचे नियोजन काशीलिंग देवस्थान ट्रस्ट व काशिलिंग बहुउद्देशीय संस्था तसेच कार्यकर्ते व ग्रामस्थ मंडळी जेऊर यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने केली होती.



तत्पूर्वी सध्या सीमेवर कार्यरत असलेल्या अक्कलकोट तालुक्यातील २८ सैनिक बांधवाचा तसेच शहीद जवानांच्या चार कुटुंबियांच्या सन्मान सोहळा देखील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. सर्व जवानांनवर पुष्पवृष्टी देखील करण्यात आले. यावेळी मल्लिकार्जुन पाटील यांनी प्रस्ताविक केले. अक्षतासोहळ्यापूर्वी जगद्गुरू डॉ.मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांचे आशीर्वचन झाले. सैनिकांत निंगण्णा माड्याळ व समीर शेख यांनी आपले मनोगत व्यक्त करून कार्यक्रमांस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संयोजन श्री काशिलिंग देवस्थान ट्रस्ट व श्री काशिलिंग बहुउद्देशीय संस्था याचे पदाधिकारी व ग्रामस्थ मंडळी जेऊर यांनी केले. बाबू चनप्पा गायकवाड यांच्या पत्नी वैजयंतीमाला बाबू गायकवाड, बसवराज बळुंडगी यांचे वडील मलकण्णा बळुंडगी गुरुजी, मधुकर शामराव होटकर यांच्या बहिणी मंदाबाई व मीनाक्षी तसेच परमानंद माने यांच्या पत्नी सविता परमानंद माने यांचा सन्मान करण्यात आला. निंगण्णा चंद्रशा माड्याळ, तुकाराम महेश माने, यासीन गुलाब चौधरी, श्रीकांत अनिल साळुंखे, सलमान जिलानी जमादार, सलीम रज्जाक ठोकळे, मुस्तफा ईलाही मुल्ला,दस्तगीर हुसेन पठाण, सोहेल इब्राहिम शेख, लक्ष्मण सिद्रामप्पा बिराजदार, गोसदेव दुर्योधन काळे, नागेश टाकण्णा मिरजे, पप्पू शब्बीर शेख, सादिक हनीफ मुल्ला, राजशेखर बंडेप्पा पुजारी, समीर सिकंदर शेख, महेश भीम भगवान किरगल, सचिन कटेप्पा माने, मंजुनाथ मल्लिनाथ खेत्री, विजय परमेश्वर आरेनवरू, रुखमाजी गौतम वाघमारे, रॉकी तुकाराम होटकर,आकाश रमेश देसाई आणि मौला सैपन मुजावर यांचा यथोचित सन्मान झाला.

# रोटरीच्या वतीने जयपुर फुट आणि कृत्रिम अवयवांचे वाटप

**लातूर/प्रतिनिधी**

देशात अपंगाची संख्या लक्षणीय असुन त्यांना सामाजिक संघटनेच्या माध्यमातून कुटूंबाचा भार तसेच आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोटरी चे योगदान कौतुकस्पद आहे असे प्रतिपादन लातूर महानगर पालिकेचे माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी औसा रोडवरील कल्पतरू मंगलकार्यालयात मोफत अवयव वाटप शिबीराचे उदघाटन प्रसंगी व्यक्त केले.

त्यावेळी अध्यक्ष म्हणुन रोटरीचे माजी प्रांतपाल डॉ.हरिप्रसाद सोमाणी हे होते. मागच्या महिन्यात दहा ते अकरा जिल्हा व लगतच्या जिल्हयातील अडीचशे दिव्यांगाचे मोजमाप घेऊन त्यातील दिडशे दिव्यांगाचे मोजमाप घेवुन त्यातील दिडशे दिव्यांगाना रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट व रोटरी परिवाराच्या वतीने संयुक्तपणे हात पाय व कुबडयांचे वाटप पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी गोजमगुंडे पुढे म्हणाले की, एखादया गोरगरीब, वाडीवस्तीवर राहणाऱ्या अपंगाला अशी मोफत मदत केल्यावर त्यांच्या चेहर्यावर उमटणारे समाधानाचे स्मित ही दात्यासाठी मोठया पुरस्कारापेक्षा जास्त उंचीची असते ते



कुटूंब कोणत्या वेदनेतुन, त्रासातुन जात असते ते दुसर्यालां सांगु शकत नाहीत हे पूण्य रोटरी सारखा सामाजिक संघटनेने वाटुन घेतले ही खुप समाधानाची बाब असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.हरिप्रसाद सोमाणी यांनी रोटरी ही जगभरात समाजउपयोगी काम करत असुन लोकांच्या खांदयाला खांदा लावून काम करते म्हणुन तिची प्रतिमा उंचावलेली आहे. पुढे दर दोन वर्षांनी अशा प्रकल्पाची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. लातूर मधील सर्व रोटरी क्लबच्या वतीने या जयपुर फुट प्रोजेक्टचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रो.मेघराज बरबडे यांनी तर आभार प्रोजेक्ट चेअरमन रमेश चिल्ले यांनी केले. सुत्रसंचलन रो.राजाराम दावणकर व रो.रविकिरण चव्हाण यांनी केले. शिबीर यशस्वी होण्यासाठी रो.हेमंत रामढवे, रो.राजेंद्र सुराणा, रो.पुष्पराज खुब्बा, रो.जी ए.कुलकर्णी, रो.अगवाणी, रो.स्वामी, डॉ. शिंगटे आदीनी प्रयत्न केले. तसेच सर्व क्लबच्या प्रोजेक्ट चेअरमन यांनी योगदान दिले.

# जांबोरी येथील आठव्या राष्ट्रीय मेळाव्यातील उत्तम कला अविष्काराबद्दल शिक्षकांचा गौरव!

**लातूर/प्रतिनिधी**

राज्यस्थान राज्यातील जांबोरी-पाली येथे, भारत स्कॉऊट अन्ड गाईडच्या संपन्न झालेल्या ८ व्या राष्ट्रीय मेळाव्यामध्ये, लातूर येथील कांही शाळांच्या सहभागी कलाशिक्षकांनी, आपल्या विशेष कौशल्य गुणांचा उत्तम कला आविष्कार निर्माण केल्यामुळे लातूर येथे भारत स्कॉऊट ॲन्ड गाईड जिल्हा कार्यालयाच्यावतीने, जिल्हा मुख्य आयुक्त तथा प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांच्या हस्ते, गुलाबपुष्प व प्रशस्तीपत्र देऊन, सदर आठ शिक्षकांचा गौरव करण्यात आला. प्रारंभी लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेस, प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. स्थानिक लातूर शहरातील वेग-वेगळ्या ८ माध्यमिक विद्यालयांतील चित्रकला शिक्षकांनी, जांबोरीच्या आठव्या राष्ट्रीय मेळाव्याच्या स्वागत प्रवेशव्दाराची, अत्यंत कल्पक व कलात्मक अशी निर्मिती केली होती. सदर कलाविष्कारामध्ये त्यांनी लातूर येथील गंजगोलाई, हुतात्मा स्मारक स्तंभ,



किल्ला आदी बाबींचा समावेश केला होता. याचे विविध राज्यातील बहुतांष प्रतिनिधींना आवर्जून कौतूक केले.

त्यानिमित्याने, प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती वंदना फुटाणे यांच्या हस्ते, विद्या विकास विद्यालयाचे कलाशिक्षक तेजेष शेरखाने, यशवंत विद्यालयाचे शिवाजीराव हांडे, ज्ञानेश्र्वर विद्यालयाचे ज्ञानेश्र्वर बेंबडे, शिवाजी विद्यालयाचे अशोक तोगरे, निर्मलादेवी विद्यालयाचे सचिन रणखांब तसेच बाळकृष्ण कांबळे, कृष्णा पांचाळ, दावणगावे या शिक्षकांना गौरविण्यात आले. यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा चिटणीस संजय क्षीरसागर, प्रशिक्षण आयुक्त युवराज माने, धोंडिराम पाटील, सचिन सुरवसे, आबा जोगदंड आदी अधिकारी उपस्थित होते. तर श्रीमती फुटाणे यांनी उपस्थित मुख्याध्यापक व शिक्षकांना संबोधीत केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा संघटक डॉ. शंकर चामे यांनी केले. तर सूत्रसंचालन जिल्हा संघटक श्रीमती रुपाली मुधोळकर यांनी केले. आणि अरुणा कांदे यांनी आभार प्रदर्शन केले. तर विद्या विकास विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री बजरंग चोले, उप-मु.अ.श्री जितेंद्र कातपुरे, श्रीमती अनिता खरटमोल व शिरीषकुमार शेरखाने आदींनी, सदर कला शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.



# चेतन ठाकरे यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहीर

**वाडा/प्रतिनिधी**

माण प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा येथील माध्यमिक शिक्षक व मोहो खुर्द गावचे रहिवासी चेतन रमेश ठाकरे यांना अविष्कार सोशल अँड एज्युकेशनल फाऊंडेशन या नामांकित संस्थेमार्फत राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. अविष्कार फाऊंडेशनचे अध्यक्ष संजय पवार यांनी चेतन सरांना निवड पत्र पाठवून तसेच फोन वर संपर्क साधून सरांचे कौतुक देखील केले.१ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून दिनांक ३० एप्रिल २०२३ रोजी जोतिबा रॉयल रिसॉर्ट, क्षेत्र जोतिबा वाडी तालुका पन्हाळा,जिल्हा कोल्हापूर येथे अनेक मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. चेतन सरांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असून अनेक क्षेत्रात त्यांचे भरीव कार्य असते.ते विद्यार्थीप्रिय, समाजप्रिय शिक्षक असून अनेक आदर्श विद्यार्थी त्यांनी घडविले आहेत.त्यांनी शैक्षणिक, सामाजिक, कृषी, क्रीडा, सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी बजावली आहे.आतापर्यंत महाराष्ट्रातील अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. सर्व क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## खंडणी मागणाऱ्या तिघांना गुन्हे शाखेने केले जेरबंद

सोलापूर : जिल्हा ग्रामीण डाक सेवक कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन राजकुमार नागनाथ आतकरे (४७) यांना तीन लाखांची खंडणी मागणाऱ्या राजशेखर मल्लाप्पा जेऊरकर (४३) मरोळाराज्य संगमनाथ हिरेमठ (३२) व अनमोल अनिल केवटे (३२) या तिघांना सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. पतसंस्थेने बांधकाम परवाना नसताना बिल्डिंग खरेदी केली मृत कर्मचाऱ्यांच्या नावाने खोटे कर्ज काढले. या कारणावरून तिघांनी वेगवेगळ्या ठिकाणी तक्रारी अर्ज दिले होते. सामाजिक माध्यमातून बदनामीकारक माहिती प्रसारित करून राजकुमार आतकरे यांना त्रास देत होते तक्रारी अर्ज मागे घेण्यासाठी पैसे द्यावे लागतील म्हणून खंडणीची मागणी करत होते.




# औसा कृषी उत्पन्न बाजार समिती महाविकास आघाडीकडून भाजपने हिसकावली!



**औसा/शिवाजी मोरे**

२८ एप्रिल २०२३ रोजी तब्बल ०७ वर्षानंतर झालेल्या कृषी उत्पन्न बाजार समिती औशाच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस राष्ट्रवादी आणि शिवसेना, महाविकास आघाडीला जोरदार हाबडा देत भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी महाविकास आघाडी कडून कृषी उत्पन्न बाजार समिती हिसकावून घेतली आहे. विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्याच्या विश्वासावर कृषी उत्पन्न बाजार समितीवर निर्विवाद वर्चस्व स्थापन करीत महाविकास आघाडी कडून कृषी उत्पन्न बाजार समिती औसा हिसकावून घेत, महाविकास आघाडीला दणका दिला आहे. भारतीय जनता पार्टीच्या वतीने १६ उमेदवार उभे केले होते. हे सर्वच उमेदवार १०० पेक्षा अधिक मताधिक्याने दणदणीत विजय संपादन करीत सर्वच उमेदवारांनी यशश्री खेचून आणली. महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांना आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. हमाल मापाडी मतदारसंघातील शंकर शहाजी पुंड यांच्या रूपाने सर्वप्रथम निकाल लागत भारतीय जनता पार्टीने खाते उघडले. नंतर झालेल्या ग्रामपंचायत आणि सहकारी संस्था मतदार संघात सुरुवातीपासूनच भारतीय जनता पार्टीचे उमेदवार आघाडीवर होते. आमदार अभिमन्यू पवार भारतीय जनता पार्टीचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, तालुका अध्यक्ष सुभाष जाधव, जिल्हा उपाध्यक्ष सुनील उटगे, भीमाशंकर राजट्टे, नेते सुशीलकुमार बाजपाई, ...पान ६ वर

# केईम हॉस्पिटलसमोरील टॅक्सी वाल्याचा पेशंटला घेण्यास नकार

## भोईवाडा व वाहतूक पोलिसांचाही तक्रार घेण्यास नकार



**मुंबई/प्रतिनिधी**

परळच्या केईएम रुग्णालयात रोज ५ हजाराहून अधिक रुग्ण उपचार घेण्यासाठी येतात पण उपचार घेऊन घरी जाण्यासाठी किंवा दुसऱ्या रुग्णालयात जाण्यासाठी जेंव्हा त्यांना टॅक्सीची गरज असते. तेंव्हा केम हॉस्पिटल समोर जे टॅक्सी वाले उभे असतात ते भडे नाकारतात केवळ लांबचे भाडे असेल तरच घेतात. त्यामुळे रुग्णांची मोठी गैरसोय होते. रविवार २३ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ११ वाजता सुजाता जाधव ही गुडघे आणि कंबर दुखीच्या त्रासावर उपचार घेण्यासाठी पतीसह मुंबईतील केईएम रुग्णालयामध्ये आली होती. तिथे उपचार घेऊन ती टिबी हॉस्पिटल येथील आपल्या घरी जाण्यासाठी निघाली होती, पण जवळचे भाडे असल्याने टॅक्सीवाल्याने त्यांना नेण्यास नकार दिला. भाडे नाकारणे हा कायद्याने गुन्हा आहे आणि हॉस्पिटल जवळ भाडे नाकारणे हा तर त्याहीपेक्षा मोठा गुन्हा आहे. दरम्यान सुजाता जाधव यांचे पती बापू जाधव यांनी सदर घटनेची फिर्याद नोंदवण्यासाठी भोईवाडा पोलिस ठाणे गाठले. पण तिथे ड्युटीवर असलेले ठाणे अंमलदार आव्हाड यांनी त्यांची फिर्याद नोंदवून घेण्यास नकार दिला ...पान ६ वर







# वाडा शहरात शिवजयंती उत्साहात साजरी



**वाडा/प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) वाडा शहर शाखेच्या वतीने अशोकवन येथील अशोकगड येथे अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्तावर शिवजयंती निमित्त शिवपूजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. गड किल्ले स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. स्वर्गीय धर्मवीर आनंद दिघे यांनी अक्षय्य तृतीयेच्या दिवशी शिवजयंती साजरी करण्याची परंपरा चालू केली असून शनिवारी ४१ वी जयंती साजरी करण्यात आली. या भव्य मिरवणूकित घोडे, तलवार, भाले, यांच्यासह ऐतिहासिक वेशभूषा धारण केलेले मावळे व विशेष करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेत असलेल्या कलाकाराने सर्वांची मान खाली झुकवून मुजारा करायला लावलेल्या त्या अभिनयाने प्रत्येक्ष छत्रपती शिवजी महाराजांची अनुभूती करून दिली. ढोल, ताशांच्या निनादात परळी नाका ते खंडेश्वरी नाका दरम्यान मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विरार येथे क्रांती मित्र मंडळातर्फे विनामूल्य नेत्रोपचार शिबिर संपन्न



**विरार/प्रतिनिधी**

विरारमधील क्रांती मित्र मंडळ यांच्याकडून आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. सालाबाद प्रमाणे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. क्रांती मित्र मंडळाचा वर्धापन दिन व भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून गरजू व गोरगरीब लोकांसाठी विनामूल्य नेत्रोपचार शिबिर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. श्रीश गोविंदराव उपाध्ये (एम.डी.) यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. जय सिताराम देसाई अध्यक्ष वसई जनता सहकारी बँक, प्रशांत राऊत स्थायी समिती सदस्य, रामधनी अशोकराव चाटे-पाटील सदस्य ग्रामपंचायत बीड, गोरख श्रीराम वाव्हळ मुख्य कार्यकारी अधिकारी, ॲड. विलासराव चाटे (मुंबई हायकोर्ट) यांची प्रमुख उपस्थिती होती. या आरोग्य शिबिरामध्ये डोळ्याची तपासणी करून चष्माचे वाटप करण्यात आले. याचा शेकडो लोकांनी लाभ घेतला. क्रांती मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सदाशिव वाव्हळ हे गेल्या अनेक वर्षापासून क्रांती मित्र मंडळातर्फे विविध कार्यक्रम राबवत असतात. गरीब-गरजू विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे वाटपण्याचा कार्यक्रम असो कि गरीब गरजू महिलांना शिलाई वाटपाचा कार्यक्रम असो. असे विविध समाज उपयोगी उपक्रम राबवत असतात. क्रांती मित्र मंडळ गेल्या अनेक वर्षापासून वसई विरार शहरात सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतीक काम करत आहे. २३ एप्रिल रोजी रानडे तलाव येथे नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंडळाचे पदाधिकारी, रहिवासी उपस्थित होते.